cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५३ | रविवार, दि.२८ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# जे राहिले होते तेही गेले, शेतीमालाचा शेतातच चिखल

# मराठवाड्यावर पुन्हा आभाळ कोसळले!

मुंबई । प्रतिनिधी

**मराठवाड्यात दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले आहे. नांदेड, हिंगोली, धाराशिव, बीड, लातूरमध्ये शुक्रवारी रात्री आणि शनिवारी दिवसभर पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावली. आधीच्याच पावसामुळे शेतकरीराजा संकटात सापडला होता. त्यात आता पुन्हा एकदा पावसाने हाहाकार माजवला आहे. यामुळे मराठवाड्यावर पुन्हा एकदा आभाळ कोसळल्याची परिस्थिती असून, तीन दिवसापुर्वी आलेल्या संकटातून जे वाचले होते ते सगळे या मुसळधार पावसामुळे हातातून गेले आहे. शेत मालाचा शेतातच चिखल झाला आहे. दरम्यान, आणखी दोन दिवस अति मुसळधार पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.**

मुसळधार मराठवाडा, विदर्भात फार मोठे नुकसान झाले आहे. पावसामुळे पैनगंगा नदीच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी हिंगोली-पुसद हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. हिंगोलीच्या कळमनुरी तालुक्यातील माळेगाव परिसरात पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसह वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक वाहने रस्त्यावर अडकून पडली आहेत. दुसरीकडे लातूर जिल्ह्यातील मन्याड नदीच्या पाणी पातळीतही मोठी वाढ झाली आहे. शेणकुडमधील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात ▶▶ पान २ वर



### बीड जिल्ह्याला पुन्हा झोडपले

मध्यरात्रीपासून बीड जिल्ह्याला पावसाने पुन्हा झोडपले आहे .अनेक सखल भागात पाणी शिरले असून, बीडचे ग्रामीण पोलीस ठाणे देखील पाण्यात गेले आहे. पोलीस ठाण्यात पाणी शिरल्यामुळे सकाळपासून कामकाज बंद आहे. माजलगावच्या बडेवाडी जिल्हा परिषद शाळेतही पावसाचे पाणी साठल्याने शाळेला तळ्याचे स्वरूप आले आहे. शाळेतील साहित्याचे देखील मोठे नुकसान झाले असून, शाळेला अघोषित सुट्टी मिळाली आहे. हिंगोलीत कयाधू नदीच्या पुराचे पाणी जिनिंग कंपनीत शिरून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

### राज्यात ५७ हजारांवर पशुधनाचे नुकसान

अचानक पडलेल्या पावसामुळे मराठवाड्यातील मांजरा, सिंदफणा, सीना आणि इतर लहान-मोठ्या नद्यांना पूर आला आहे. घरे, दुकाने, शेती, पिके पाण्याखाली गेली असून जनावरेही वाहून गेली आहेत. पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात १ हजार ६०१ मोठी जनावरे, १ हजार ७९९ लहान जनावरे आणि ५४ हजार ३३८ कोंबड्यांची जीवितहानी झाली आहे. यासोबतच मराठवाड्यात आणि पूरग्रस्त भागांमध्ये जनावरांच्या मृत्युमुखी पडण्याचा आकडा वाढत असून, मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होत आहे.

### लातूरमध्ये बचाव पथकांना पाचारण

लातूरचा जळकोट तालुक्यातील बेळसावंगी गावाला पाण्याचा वेढा बसला आहे. संपूर्ण गाव दोन्ही बाजूंनी पुराच्या पाण्याने वेडले गेले आहे. तिरू नदीच्या प्रकल्पामधूनही पाण्याचा विसर्ग सुरू आहे. जर आणखी पाऊस पडला तर परिस्थिती बिकट होऊ शकते. या गावात साधारण ७०० ते ८०० लोकसंख्या असून सर्वांचे तातडीने स्थलांतर करणे आवश्यक बनले आहे. यासाठी स्थानिक अग्निशामक विभागाच्या दोन टीम घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी घटनास्थळी भेट दिली असून, भारतीय लष्कराच्या पथकांना प्राचारण करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

### धाराशिव जिल्ह्यात अनेक गावचा संपर्क तुटला

धाराशिव जिल्ह्यात शुक्रवारी रात्रीपासून पावसाचा वेग प्रचंड वाढला. तो शनिवारी पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत सुरु होता. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश प्रकल्प, नद्या, नाले, ओढे यांना महापूर आला आहे. तसेच या नदी नाले, ओढ्यावरील पुलावरुन पाणी ओसंडून वाहत असल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या गावचे संपर्क तुटले आहेत. तर १ हजार लोकांना प्रशासनाकडून सुरक्षीत ठिकाणी हलविले आहे. पिकांच्या नुकसानीबरोबर घरांचे, शेतीची खरडून जावून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सिना कोळेगाव प्रकल्प तुडूंब भरला आहे. या धरणातून शनिवारी सायंकाळी ५ वाजता ८० हजार १५० इतका विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे सिना नदीच्या दोन्ही तिरावरील शेतकरी, नागरिक या सर्वांनी सतर्कतता बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### अंगणवाडी शिक्षिकांच्या निवृत्ती वयोमर्यादेत वाढ

मुंबईः मुंबई महानगरपालिकेने बालवाडी शिक्षिका आणि मदतनीसांसाठी सेवासमाप्तीच्या वयोमर्यादेतीसांसाठी सेवासमाप्तीचे वय ५८ वर्षे होते. मात्र, आता शासनाच्या निर्णयानुसार, १ नोव्हेंबर २०१८ पासून नव्याने नियुक्त अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांसाठी सेवासमाप्ती वयोमर्यादा ६० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय, मदतनीस ते अंगणवाडी सेविका म्हणून पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे सेवासमाप्ती वयही ६० वर्षेच राहील.

### राज्यात ८९ फार्मसी कॉलेजचे प्रवेश रोखले

मुंबईः उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील वारेमाप वाढलेल्या फार्मसी संस्थांची तपासणी करत भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेकडे (पीसीआय) अहवाल पाठविला होता. त्यानंतर राज्यातील फार्मसीच्या पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या ८९ संस्थांना प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेतून बाहेर काढण्यात आले आहे. पदविका ७१ संस्थांचा आणि पदवीच्या १८ संस्थांचा समावेश आहे. या संस्थांची यादीही पीसीआयने जाहीर केली आहे. गेल्या चार वर्षापूर्वी कोरोना काळात राज्यातील फार्मसी संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली होती. त्यामुळे अनेक नव्या संस्थांनी मान्यतेसाठी पीसीआयकडे अर्ज पाठवले होते.

### हवामान विभागाकडून मुंबईसाठी आज रेड अलर्ट

मुंबईः मुंबईसाठी रविवारी (२८ सप्टेंबर) रोजी हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं मुंबईत अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यासोबतच, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये देखील रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणात सर्वत्र विजांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सध्या राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाने थैमान घातला आहे. विविध भागात नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. शेती पिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकरी भरपाई देण्याची मगणी सरकारकडे करताना दिसत आहे. आम्ही जगावे कसे, असा सवाल देखील शेतकरी करत आहेत.

### लाडक्या बहिणींना मिळणार १ लाखापर्यंत विशेष कर्ज

मुंबई : मुंबईत लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना व्यवसायासाठी १० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. मुंबई बँकेच्या माध्यमातून ही विशेष कर्ज योजना राबविण्यात येणार आहे. या कर्जाचे हप्ते शासनाकडून दरमहा मिळणाऱ्या दीड हजार रुपयांच्या मानधनातून वळते करण्यात येणार आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्या माध्यमातून वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेच्या लाभार्थी महिलांना व्यवसायासाठी कर्ज दिले जाते.

## शासन धोरणाच्या विरोधात शेतकरी संघटनेचे उद्या राज्यव्यापी आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

ओल्या दुष्काळाच्या यादीतून चंद्रपूर जिल्हा वगळण्यासोबतच राज्यातील इतर आपद्ग्रस्त भागासाठी देखील तोकडी मदत जाहीर करण्यात आली आहे. याचा निषेध म्हणून शेतकरी संघटनेच्या (शरद जोशी) वतीने सोमवारी (दि.२९) राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.

शेतकरी संघटनेचे युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष ॲड. दीपक चटप यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्याच्या इतर भागासोबतच चंद्रपूर जिल्ह्यात देखील संततधार पाऊस, अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. असे असताना राज्य सरकारने चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश ओला दुष्काळप्रवण जिल्ह्याच्या यादीत केलेला नाही. हा या भागातील शेतकऱ्यांवर मोठा ▶▶ पान २ वर

## नगर जवळ प्रा.हाकेंच्या गाडीवर हल्ला

### त्यानंतरही भर पावसात दैत्यनांदूर मध्ये झाली सभा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

ओबीसे नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील दैत्यनांदूर येथे ओबीसी समाजासाठी आयोजित मेळाव्यासाठी ते आले होते.ते अहिल्यानगरच्या दिशेने रवाना झाले, मात्र त्यापूर्वी त्यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला असून, या हल्ल्यात त्यांच्या गाडीच्या काचा फुटल्या आहेत. या हल्ल्यात ▶▶ पान २ वर



## धनगर समाजाला न्याय देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी घेतली उपोषणकर्ते बोऱ्हाडे यांची भेट

जालना । प्रतिनिधी

धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा या प्रमुख मागणीसाठी गेल्या अकरा दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांची राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट घेतली. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसंदर्भात आमच्या



मनात संवेदना आहेत, मुख्यमंत्र्याशी चर्चा करून लवकरच यातून मार्ग निघेल असा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

राज्याच्या कॅबिनेट मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे आणि मंत्री गिरीश महाजन यांनी आज दीपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणाला भेट देऊन उपोषण सोडण्याची विनवणी केली. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, मागच्या ११ दिवसांपासून दीपक बोऱ्हाडे यांचं उपोषण सुरु आहे. या जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून मी इथे आलेले आहे. ▶▶ पान २ वर

## शेतकऱ्याचा पुरात उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील दहिटणा गावातील एका शेतकऱ्याचे उभे पीक पाण्यात गेल्याने त्या शेतकऱ्याचा धीर खचला. आता आपले काय होणार या धास्तीने त्या शेतकऱ्याने ओढ्याला आलेल्या पुराच्या पाण्यात उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र दुसऱ्या एकाच्या समय सूचकतेमुळे अनर्थ टळला.

मागील आठवड्या पासून बीड जिल्ह्यात आणि केज तालुक्यात सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसाने शेतातील पिके सडून गेली असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. शेतात केलेला खर्च आणि त्यातून निघणाऱ्या उत्पन्नावर शेतकऱ्याचे ▶▶ पान २ वर

## माळ सातवी



सप्तमीचे दिवशीं
सप्तश्रृंगगडावरी हो ।
तेथें तं नांदसी
भोंवती पष्पें नानापरी हो ।
जाई जुई शेवंती पूजा
रेखियली बरवी हो ।
भक्त संकटी पडता
झेलुनी घेसी वरचेवरी हो ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

## फटाक्यांवर पूर्ण बंदी म्हणजे माफियांच्या हाती उद्योग सोपवण्यासारखे-सुप्रीम कोर्ट

दिल्ली। वृतसंस्था

बिहारमधील खाणकामावर पूर्ण बंदी घातल्यानंतर या उद्योगात माफियांचा शिरकाव झाला, तसाच फटाक्यांवर पूर्ण बंदी घातल्यास माफियांचा सुळसुळाट वाढेल. हे माफिया अवैध मार्गाने सर्वसामान्यांना फटाक्यांची विक्री करतील, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

फटाके बंदी आदेशाबाबत मागील अनुभवांवरुन स्पष्ट होते की, कोणतीही बंदीचा आदेश हा १०० टक्के यशस्वी होत नाही. त्यामुळेच हजारोंना रोजगार देणाऱ्या फटाका उद्योगावर कठोर आणि हुकूमशाही पद्धतीने नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न निरर्थक ठरू शकतो, असेही सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले.

## दूध भेसळखोरांना अटकाव घालण्यासाठी हिवाळी अधिवेशनात कायदा-अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

राज्यात दूध भेसळखोरांना अटकाव घालण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात कठोर कायदा करण्याचे सूतोवाच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे केले. लहान मुलांपासून सर्वच जण दूध पितात आणि भेसळीने आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे गाय-म्हशीच्या गुणवत्तापूर्ण दुधाची विक्री करण्यावर भर देऊन ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले. ▶▶ पान २ वर




## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६९.०० क्विंटल | २,२९१ | २,८९९ | २,५७५ |
| ज्वारी/हायब्रिड: ६६.५० क्विंटल | २,०७० | ३,१५२ | २,३६६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ३,८०० | ५,९०० | ५,१९५ |
| बाजरी: ११०.०० क्विंटल | २,२०० | ४,५०० | २,६८८ |
| मुग: १६.५० क्विंटल | ४,४०० | ७,६७१ | ५,९८६ |
| सोयाबीन: ४.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,९५० | ४,९५० | ४,९५० |

# अखंड ओबीसीतील घटकांच्या वेगळ्या चुली !




• सुभाष चौरे •

ओबीसीमध्ये साडेतीनशे पेक्षा अधिक असलेल्या जाती जमाती, मराठा आरक्षणानंतर एकसंघ झाल्या होत्या मात्र मराठा आरक्षण देत असताना ज्या हैदराबाद गॅझेटचा उल्लेख झाला त्याच गॅझेटमध्ये ओबीसी मधील असलेल्या काही जातींचा एसटी, एसटी असा उल्लेख असल्याने आजपर्यंत एकसंघ वाटत असलेला

### ● ओबीसी आंदोलनाची धार बोथट होण्याची शक्यता

ओबीसी समाजातील घटक वेगळ्या कॅटेगिरीची मागणी करत आहेत. त्यामुळे एकसंध वाटणारा आणि दिसणारा ओबीसी समाज आता आपसात वेगळ्या चुली मांडत असल्याचे चित्र राज्यभरात दिसत आहे. यामुळे ओबीसीची आंदोलनाची धार बोथट होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

ओबीसी समाजामध्ये माळी, धनगर, वंजारी - बंजारा, कोळी, साळी, कुंभार, तेली, तांबोळी, हटकर, कातकरी, चांभार, ढोर, पांगुळ, रामोशी, परीट यांच्यासह साडेतीनशे पेक्षा अधिक जाती येतात. प्रामुख्याने माळी, धनगर, वंजारा आणि बंजारा





या प्रमुख जाती संख्येने मोठ्या आहेत. मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसीमधून आरक्षण दिल्यानंतर ओबीसी समाजाने त्याला विरोध दर्शवला. हैदराबाद गॅझेटमध्ये कुणबी मराठा अशी नोंद असल्याने कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय शासनाने दिला. मराठा समाजाचा या मार्गाने ओबीसीमध्ये समावेश झाल्यामुळे ओबीसीच्या ताटामध्ये आणखी एक जात आल्याने ओबीसींना आपले आरक्षण सुरक्षित नाही हे वाटू लागले. ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ, प्राध्यापक लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, मंगेश ससाने यांच्यासह अन्य ओबीसी मधील लोकप्रतिनिधी ▶▶ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# सत्तेवर येण्यासाठी वाट्टेल ते !

बिहारमध्ये लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने विविध प्रकारच्या योजनांचा आणि आश्वासनांचा धडाका लावला असतानाच शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या उपस्थितीमध्ये आणखी एका महिला योजनेची घोषणा केली. 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजना' नावाच्या या योजनेच्या माध्यमातून बिहारमधील ७५ लाख महिलांना रोजगार निर्मितीसाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. ही योजना घोषित करत असतानाच या महिलांच्या खात्यामध्ये दहा हजार रुपयेही जमा करण्यात आले आणि आणखी सहा महिन्यांनी त्यांच्या गरजेप्रमाणे या महिलांना रोजगारासाठी दोन लाख रुपये आर्थिक मदत दिली जाणार आहे. बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला मतदारांची संख्या नजरेसमोर ठेवून नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी हा निर्णय घेतला हे उघड आहे.

महिला मतदार चमत्कार करतात हे यापूर्वी काही राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालांनी सिद्ध केले असल्यामुळे त्याच प्रकारचे कार्ड बिहारमध्येसुद्धा खेळण्याचा प्रयत्न मोदी आणि नितीशकुमार यांनी केलेला दिसतो. महाराष्ट्रामध्ये लाडकी बहीण योजनेमुळे चमत्कार घडला आणि भाजप आघाडीला अभूतपूर्व असे बहुमत मिळाले. त्यापूर्वी मध्य प्रदेशातसुद्धा तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी लाडली बहना योजना जाहीर केली होती. या योजनेमुळे त्यांना पुन्हा एकदा सत्तेवर येणे शक्य झाले होते. इतर काही राज्यांमध्येसुद्धा महिला मतदारांची संख्या लक्षात घेऊन अशा प्रकारच्या महिला योजनांची घोषणा केली होती. बिहारमध्ये जरी लाडकी लेक किंवा लाडली बहनासारख्या योजना शक्य नसल्या तरी महिलांना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टिकोनातून ही मुख्यमंत्री महिला रोजगार योजना जाहीर करण्यात आली आहे. महिलांनी स्वयंरोजगाराला प्राधान्य द्यावे आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करावा आणि या निमित्ताने इतरांना रोजगार द्यावा अशा प्रकारची मांडणी या योजनेसाठी केली जात आहे. साधारणपणे देशातील महिला बचत गटांच्या माध्यमातून ज्या प्रकारची उत्पादने तयार केली जातात आणि विकली जातात त्याच प्रकारचे काम या योजनेच्या माध्यमातून महिलांनी करावे अशी अपेक्षा आहे. या महिला रोजगार योजनेच्या माध्यमातून लाभ मिळालेल्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू सरकारी माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. अर्थात, भारतातील कोणतीही योजना ज्याप्रमाणे कागदावर नेहमीच आदर्श असते, त्याचप्रमाणे ही योजनासुद्धा आदर्शच वाटत आहे. या योजनेवर जरी विरोधकांनी टीका केली असली तरी महिला मतदारांना केंद्रस्थानी ठेवून नितीशकुमार सरकारने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक मोठी राजकीय खेळी केली आहे हे मान्यच करावे लागते. अशा प्रकारच्या योजना जाहीर करताना निधीचा कोणताही विचार केला जात नाही. पण नंतर मात्र निधीच्या टंचाईमुळे किंवा कमतरतेमुळे अशा प्रकारच्या योजना अडचणीत येतात. त्याचे ताजे उदाहरण महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजना हे आहेच. इतर अनेक आर्थिक मदत योजनांमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठ्या प्रमाणावर आर्थिक हल्ला होतो आणि इतर विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत नाही हेसुद्धा अनेक वेळा सिद्ध झाले आहे. अर्थात, याची कल्पना असतानासुद्धा नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी या योजनेची घोषणा केली आहे, कारण बिहारमध्ये पुन्हा सत्तेवर येण्यासाठी कोणतीही कसर बाकी ठेवायची नाही हाच उद्देश त्यामागे आहे. मुख्यमंत्री महिला रोजगार योजना ही एक सुरुवात असू शकते. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात कदाचित बिहार विधानसभा निवडणुकीची घोषणा होणार आहे. त्यापूर्वी अशा प्रकारच्या आणखी काही रेवडी योजनांच्या घोषणा झाल्या तर आश्चर्य वाटायला नको. बिहारमधील नितीशकुमार सरकार निष्क्रिय आहे आणि केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारकडूनसुद्धा काही अपेक्षा बाळगता येत नाहीत अशा प्रकारची प्रचाराची मोहीम बिहारमध्ये विरोधी पक्षांकडून राबवली जात असतानाच अशा प्रकारच्या योजनांची घोषणा करून काही प्रमाणात विरोधी पक्षांच्या प्रचाराला छेद देण्याचे काम नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी केले आहे. पण अशा प्रकारच्या योजनांचा फोलपणा जर विरोधी पक्षांनी आपल्या प्रचाराच्या माध्यमातून स्पष्ट केला, तर बिहारमधील या प्रचाराला एक वेगळी रंगत येणार आहे. सध्या तरी महिलांचे तारणहार आम्हीच आहोत अशा प्रकारची भूमिका नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी घेतली आहे. निवडणुकीच्या काळामध्ये सत्ताधारी पक्षाकडून अशा प्रकारच्या योजनांची घोषणा हा एक सहज मुद्दा असला तरी अशा प्रकारच्या योजनांमुळे निर्माण होणारा प्रभाव जर कमी करायचा असेल तर विरोधी पक्षांना प्रचाराची योग्य रणनीती आखावी लागणार आहे. सध्यातरी बिहारमधील ७५ लाख महिलांच्या मनात एक आशादायक चित्र निर्माण करण्यामध्ये नरेंद्र मोदी–नितीशकुमार ही जोडी यशस्वी झाल्याचे दिसते.

# शिवाजीनगर व बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात पाणी घुसले; एसपी काँवत यांची पोलिस ठाण्यात भेट

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात गेल्या २४ तासात मुसळधार पावसाने हाहाःकार माजला आहे. जिल्हा आणि बीड शहरात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. शहरातील रस्ते, नाल्या, तळघरात पाणी घुसले आहे. शहरातील अनेक दुकानात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. बीड शहरातील शिवाजीनगर आणि बीड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या इमारतीत पाणी शिरल्याने काही काळ कामकाज बंद पडले होते. दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दोन्ही पोलिस ठाण्यात भेट देऊन पाहणी केली.**



बीड शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाणे सुरू झाल्यापासून पूर्वीच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांसाठी असलेल्या जुन्या इमारतीमध्ये आहे. गेल्या वर्षी सदर इमारत गळत होती. त्यावर किरकोळ उपाययोजना करण्यात आली होती. आता मात्र दोन दिवसापासून पडणाऱ्या पावसाने शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या इमारतीमध्ये पाणी घुसल्याने पोलिसाची धावपळ झाली. दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पोलिस ठाण्याला भेट देऊन पाहणी केली. बीड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या जुन्या इमारतीमध्ये पाणी घुसले. पाणी काढण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# माँ वैष्णोदेवी मंदिर संस्थाननच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन–संतोष सोहनी

**बीड । प्रतिनिधी**

नवरात्र उत्सवामध्ये बीड शहरातील विप्र नगर भागातील जय मातादी वैष्णोदेवी मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भव्य अशा प्रकारचे रक्तदान शिबिराचे २८ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत रक्तदान शिबिर संपन्न होणार आहे. मंदिर संस्थांनचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच बीड नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन माता वैष्णोदेवी मंदिर संस्थांनचे संस्थापक अध्यक्ष संतोष सोहनी



कोषाध्यक्ष, संजय सोहनी, विश्वस्त, शिवप्रसाद दायमा, गोविंद तोष्णीवाल,पवन शर्मा, मोहित कासट, बाबुराव गरजे, देशमुख साहेब, जुगलकिशोर दायमा,यांनी केले आहे. तसेच ज्यांना रक्तदान करायचे आहे. त्यांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने आपला सहभाग नोंदवावा असेही आवाहन करण्यात आले आहे. आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या सामाजिक भूमिकेतून संतोष सोहनी यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचवण्याचे मोठे पुण्य कर्म असून अशा प्रकारचे पुण्य कर्म आपल्या वाट्याला यावे आणि एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी आपण केलेले रक्तदान कामी यावे यासारखे पुण्य नाही या भावनेतून संतोष सोहनी आणि मंदिर संस्थांचे सर्व पदाधिकारी यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

# सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे उपमुख्यमंत्री पवारांनी पूरग्रस्तांना दिला धीर

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर पुन्हा वाढला असून काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. या आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी आम्ही सर्वस्व पणाला लावू, अशा आश्वासक शब्दांत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तनागरिकांना धीर दिला. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील मणार धरण परिसरातील बहाद्दरपुरा, शेकापूर, घोडज पूरबाधित नागरिकांशी त्यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून व्हिडीओ कॉलद्वारे थेट संवाद साधला.

या कॉलदरम्यान पवार यांनी नांदेड जिल्ह्यात नेमक्या कोणत्या भागांत नागरिक अडकले आहेत, त्यांच्या सुटकेसाठी हेलिकॉप्टर किंवा आर्मीची मदत घेण्याची आवश्यकता आहे का? एनडीआरएफचे पथक तातडीने पाठवावे लागेल का याबाबत सविस्तर माहिती घेतली. या संकटाच्या काळात सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या जातील. पूरग्रस्त आणि आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवली जाईल. काळजी करू नका, सरकार तुमच्या सोबत आहे, अशा शब्दांत त्यांनी पूरग्रस्तांना दिलासा दिला.धाराशिवमध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे.

# अतिवृष्टी परिस्थितीमुळे बीडचा ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलला!

**बीड । प्रतिनिधी**

**ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच पुढील तारीख जाहीर करण्यात येईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे.**

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अतिवृष्टी होत असून मुसळधार पावसाने नद्यांना पूर आलेला आहे. अनेक पुलावरून पाणी जात असल्याने वाहतूक ठप्प करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरले असल्याने परिस्थिती अवघड बनली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांना मदत करणे आपले कर्तव्य असल्याने बीड येथे आयोजित ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलून पूरग्रस्त नागरिकांना, शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन ओबीसींचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी केले आहे. यामुळे आज रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी चा बीड येथे आयोजित केलेला ओबीसी महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला असून लवकरच मेळाव्याची तारीख जाहीर केली जाईल असे मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. सुभाष राऊत यांनी कळविले आहे.

## पान ६ वरून...

### तालुक्यात अतिवृष्टीचा जोर

तहसीलदार सुरेश वाळवदे यांनी आपली पथके ग्रामीण भागात पाठवून स्वतः फिरून तालुक्यातील सर्व परिस्थितीचा आढावा घेतला व तालुक्यातील जनतेला या अतिवृष्टीपासून सतर्क राहण्याचे आव्हानही केले आहे व सर्व परिस्थिती ही हाताबाहेर जात असल्याने नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन त्यांनी केले आहे मात्र या अतिवृष्टीमुळे सर्व पिके हातची गेले असून धारूर तालुक्याचा २२ ते २५ गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला होता धारूर तालुक्यात शुक्रवारी रात्रीपासून दोन मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून पावसाची सरासरी ही दोनशे पेक्षा पुढे सरकली आहे आतापर्यंत तालुक्यात ९७३.६ मीमी पावसाची नोंद झाली असून धारूर व तेलगाव मंडळात अतिवृष्टीची नोंद चोवीस तासांमध्ये झाली आहे शनिवारी ही दिवसभर पाऊस सुरूच असल्याने पावसाचा जोर पुन्हा पुन्हा वाढत होता व शेतकरी मात्र या परिस्थितीमुळे हदबाल झाला असून ओल्या दुष्काळापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे तालूक्यात अनुचीत घटना घडल्याची नोद मात्र नाही

------------

### माजलगाव धरणातून सिंधफना

सिंधफाना नदीपात्रात एक लाख १४ हाजार ९२४.७४ क्युसेस पाण्याचा विसर्ग सिंदफणा नदी पात्रात झाला आहे त्यामुळे सिंदफणा नदी पात्राच्या गावांना प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला होता परंतु सांडस चिंचोली,मोगारा या गावासह अनेक गावांचा पुराच्या पाण्याने पूर्ण वेढल्यामुळे गावाचा संपर्क तुटला आहे. माजलगाव तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या व गोदावरी काठचे अनेक गाव हे पाण्याखाली गेले आहेत मराठवाड्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मोरेश्वर मंदिरही पाण्याखाली गेलेले आहे.त्यामुळे माजलगाव तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला असुन अनेक गावांत पाणी शिरल्याने पुर परिस्थिती बिकट झाली आहे.सध्या प्रशासनाच्या वतीने गोदावरी व सिंधफना नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

------------

### कारखेल खूर्द येथे

लक्ष्मण घुले .तलाठी दगड खैरे साहेब .ग्रामसेवक दुधाडे साहेब .संजय वनवे .आधी दिसत आहेत .शेतमालाचे नुकसान सांडवा .फुटण्याची .भीती होती ती दुरुस्त करण्यासाठी जयदत्त भयाने वरिष्ठ पातळीवर कळवले .व लवकर पंचनामे करून सर्वांना मोबदला भेटला जाईल व नुकसानग्रस्त शेतकरी राहणार नाही अशा सूचना तलाठी साहेब व ग्रामसेवक साहेबांना दिल्या

------------

### मुख्य कार्यकारी अधिकारी

झालेले आहे.यासाठी जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान परीस्थितीचा आढावा घेण्यासाठी दि २७ सप्टेंबर शनिवार रोजी टाकरवण,मंजरथ, देपेगाव याठिकाणी भेटी देऊन नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या.यामध्ये उपस्थित नागरिकांनी गावांमध्ये लाईट नसल्याने व पुरामुळे पिण्याच्या पाण्याची,रोगराई चा प्रादुर्भाव यासह अनेक समस्या मांडल्या.जितीन रहमान यांनी आरोग्य विभाग, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना सदर समस्या निवारण करण्याच्या सुचना दिल्या. तसेच गंगामसला व देपेगाव याठिकाणी टँकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केले. यावेळी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक,विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड,विस्तार अधिकारी रामकृष्ण यादव,शाखा अभियंता धोंगडे, ग्रामपंचायत अधिकारी हनुमंत राऊत,ग्रामपंचायत अधिकारी दिनेश राऊत,ग्रामपंचायत अधिकारी प्रतापसिंह नाईक यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

------------

### संत महंतांच्या मंगलमय

शिवाचार्य स्वामी महाराज यांचे आशीर्वाद व आध्यात्मिक सान्निध्य लाभले. प्रारंभी आ. धनंजय मुंडे व संत महंतांच्या हस्ते विधिवत पूजा करुन व फीत कापून पेट्रोल पंपाचे उद्धाटन झाले. यावेळी उपस्थित संत महंतांचे पूजन व यथोचित सन्मान धर्माधिकारी परिवाराच्या वतीने करण्यात आला.तसेच आ.धनंजय मुंडे यांचा हृदय सत्कार करण्यात आला. उपस्थित संत महंतांनी या नव्या व्यवसायाला आपले आशीर्वाद प्रदान केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार 'बाजीराव पेट्रोलियम'चे प्रोप्रायटर, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी, हरिहर धर्माधिकारी,अ‍ॅड. प्रताप धर्माधिकारी यांनी केला. दरम्यान, गेल्या दोन दिवसापासून परळी व परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. आजही सकाळपासूनच मोठा पाऊस सुरूच होता. मात्र या नव्या सेवा व्यवसायाच्या शुभारंभ सोहळ्याला भरपावसातही परळी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा देत धर्माधिकारी परिवारील प्रेम व्यक्त केले. त्याचबरोबर संपूर्ण दिवसभर या नव्या व्यवसायाला शुभेच्छा देण्यासाठी सर्व स्तरातील नागरिकांची 'बाजीराव पेट्रोलियम' वर रीघ लागली होती.भर पावसातही स्नेही, हितचिंतकांनी आवर्जून उपस्थित राहून भेट देऊन, सदिच्छा व शुभेच्छा व्यक्त केल्या. एक प्रकारे भर पावसातही परळीकरांचे धर्माधिकारी परिवारावरील प्रेम यानिमित्ताने ओसंडून वाहिल्याचे चित्र बघायला मिळाले.

------------

### जोला गावावरील संकट

गोविंद ढाकणे, आसाराम ढाकणे गोविंद सारुक व बाळासाहेब बिक्कड होते पण माणसाच्या हाताने शक्य नाही असे लक्षात येताच मुरलीबप्पा ढाकणे यांनी जेसिबी मशिन बोलावुन घेत तब्बल सात तास मशिन चालवुन सांडवा खोल करून घेत मौजे जोला गावावरील धोका तलाठी रविंद्र गायकवाड साहेब यांच्या सतर्कतेमुळे टळला आहे. हि संपूर्ण मोहीम तलाठी रविंद्र गायकवाड, भगवान सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष मुरलीधर बप्पा ढाकणे, महसूल सहाय्यक बाळासाहेब बिक्कड, गोविंद ढाकणे, अशोक जेधे, आसाराम ढाकणे, अविनाश सारुक, सखाराम ढाकणे, भगवान करंजकर, गणेश ढाकणे, गोविंद सारुक, ज्योतीराम ढाकणे ,तुकाराम सारुक यांच्यासह गावकरी यांनी यशस्वी केली आहे.

------------

### राष्ट्रीय सेवा योजना

आवाहन केले. स्वयंसेवकांना गटांमध्ये विभागून महाविद्यालय परिसर आणि आजूबाजूच्या जागा स्वच्छ करण्याची जबाबदारी दिली गेली. त्यांनी गवत, कचरा आणि धूळ साफ केली तसेच प्लास्टिक, कागद व इतर नष्ट न होणाऱ्या वस्तू वेगळ्या करून योग्य व्यवस्थापन केले. पर्यावरण संवर्धनासाठी झाडे लावली गेली, परिसरातील भिंती व फलकांवर स्वच्छतेबाबत संदेश लिहून जागरूकता निर्माण केली गेली. अभियानाचा समारोप करत प्रा.मंदार चौधरी यांनीस्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक केले. स्वच्छता अभियान हा केवळ एकदिवसीय उपक्रम नसून ती आयुष्यभर अंगीकारण्याची सवय असावी असे अधोरेखीत केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व स्थानिक नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले व भविष्यात अधिक व्यापक पातळीवर असे अभियान राबविण्याची ग्वाही दिली. या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली तर स्थानिक समुदायालाही स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. ज्यामुळे स्वच्छ, निरोगी आणि जबाबदार समाज घडविण्यास हातभार लागण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला.

## पान १ वरून...

### मराठवाड्यावर पुन्हा

आली आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे मराठवाड्यातील चार जिल्ह्यांत शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळपासून पुन्हा एकदा पावसाने हाहाकार माजवला आहे. पुढील दोन दिवस राज्यात अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे.

**बीड, सोलापूर, धाराशिव अहिल्यानगरात रेड अलर्ट**

हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. सोलापूरसह अहिल्यानगर, धाराशिव, बीड जिल्ह्यात शनिवारी मुसळधार पाऊस झाला असून, नद्यांना आलेल्या पाण्यामुळे अडचणी वाढल्या आहेत. या जिल्ह्यांतील अनेक नद्यांचा महापूर आला असून दोन दिवसांत याची तिव्रता आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

--------

### नगर जवळ प्रा.हाकेंच्या

लक्ष्मण हाके यांना काही झाले नाही. पण मोठ्या प्रमाणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. अहिल्यानगरजवळ असलेल्या आरनगाव बा वळण रस्त्यावर लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अज्ञात तरुणांनी हल्ला केला. आज पाथर्डी तालुक्यातील दैत्यनांदूर येथे ओबीसी एल्गार सभेसाठी लक्ष्मण हाके जात होते. त्यावेळी त्यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला. हल्ला करणारे कोण होते याची माहिती मिळू शकलेली नाही.पण काही वेळातच हल्ला करणाऱ्याचे फोटो सोशल मिडयावर व्हायरल झाले ते फोटो खा शरद पवार खा निलेश लंके यांच्या सोबतचे त्यामुळे हा हल्ला शरद पवार यांच्या समर्थकांनी घडून आणल्याचा आरोप ओबोसी समर्थकांनी केला आहे पोलिसांकडून हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे.हि घटना घडल्यानंतर प्रा लक्ष्मण हाके यांनी नियोजित स्थळी येत संत भगवाब बाबा यांच्या भगवानगडावरील समाधीचे दर्शन घेऊन भर पावसात दैत्यनांदूर येथील ओबोशी बांधवाना संबोधित केले .

--------------

### शासन धोरणाच्या विरोधात शेतकरी

आघात आणि अन्याय आहे. त्यासोबतच राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्ये जाहीर करण्यात आलेली मदत देखील तोंडाला पाने पुसण्यासारखीच आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांकरीता एका गुठ्यांसाठी ७५, तर ओलीताखालील क्षेत्रासाठी भरपाई म्हणून प्रति गुंठा १७० रुपये अशी अत्यल्प मदत जाहीर करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असल्यास हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी. त्यासोबतच योग्यवेळी सातबारा कोरा करू म्हणणाऱ्या सरकारने आता शेतकऱ्यांची अवस्था लक्षात घेता हीच योग्य वेळ प्रमाण मानत कर्जमाफीची घोषणा करावी, अशी मागणी आहे. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी सोमवारी (दि.२९) राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रांत कार्यालयासमोर शेतकरी संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनात शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन चटप, अ‍ॅड. सरोजताई काशीकर, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे, मधुसूदन हरणे, सीमा नरोडे, सतीश दाणी, राजाभाऊ पुसदेकर यांनी केले आहे.

-------------

### शेतकऱ्याचा पुरात उडी

सर्व नियोजन असते. त्या सर्व स्वप्नांची धूळधाण झाली असल्याने अनेकांचे धीर खचले आहेत. केज तालुक्यातील दहिटणा येथील खंडू हरिचंद्र मुळे या शेतकऱ्याच्या शेतातील ऊस, सोयाबीन या पिकात पाणी गेल्याने पीक हातचे गेले आहे. पेरणी, खत औषधी यासह मशागतीसाठी झालेले कर्ज आणि मेहनत वाया गेली. त्यामुळे आता सावकार आणि बँकेचे कर्ज कसे फेडणार? या विवंचनेने शेतकऱ्यांचा आत्मविश्वास खचून नैराश्य आले. त्या नैराश्यातून खंडू मुळे या शेतकऱ्याने दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी नाव्होली कडून दहिटन्याकडे वाहत असलेल्या ओढ्याला आलेल्या पुरात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र त्यांची चलबिचल पाहून ते ओढ्याच्या प्रवाहाकडे जात असताना त्या ठिकाणी असलेल्या राजाभाऊ कातमांडे यांनी पळत जाऊन खंडू मुळे यांना धरून त्यांना समजावून रोखण्याचा प्रयत्न केला. कातमांडे यांच्या समयसूचकते मुळे खंडू मुळे यांचे प्राण वाचलेले आहेत.

-----------

### धनगर समाजाला न्याय देण्याची

त्यांनी केलेल्या मागण्या मागच्या ७० वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यांच्या मागण्यांसंदर्भात आमच्या संवेदना आहेत. देवेंद्र फडणवीस भाजपचे प्रदेशाध्यक्ष असताना बारामतीमध्ये भव्य कार्यक्रम झाला होता. तेव्हा त्यांनी धनगर समाजाला आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. त्या शब्दाबद्दल कुणाच्याही मनामध्ये किंतू नाही.

**धनगर समाजाला न्याय देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका**

पंकजाताई पुढे म्हणाल्या, आदिवासी समाजाला न दुखावता धनगर समाजाला न्याय देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका आहे. दीपकभाऊ हे समजूतदार आहेत. त्यांनी अडमुठेपणा केला नाही, बोलतानाही त्यांनी सभ्य भाषेत मतं मांडली. दीपकभाऊ यांनी एक पर्याय दिला आहे, त्या पर्यायाबद्दल आम्ही मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहोत. मी पालक म्हणून इथे आले आहे, त्यामुळे त्यांनी उपोषण सोडलं पाहिजे. एवढा लढणारा माणूस जीवावर बेतून उपोषण करत आहे, हे चांगले नाही.

------------

### दूध भेसळखोरांना अटकाव

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मुख्यालयात झाली. या वेळी व्यासपीठावर आमदार शंकर मांडेकर, माजी आमदार अतुल बेनके यांच्यासह संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. स्वप्निल ढमढेरे, उपाध्यक्ष मारुती जगताप व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. या वेळी अजित पवार यांच्या हस्ते कात्रज दूध संघाच्या नवीन स्वयंचलित दूध व दुग्धजन्य पदार्थ प्रकल्प, कात्रजचा दूध व दुग्धजन्य पदार्थांचा मिनी मॉल, कात्रज डेअरी प्रॉडक्ट रिबांडिंग, ईशान्वी हनी व ड्रोन इत्यादीचे डिजिटल पद्धतीने उद्धाटन करण्यात आले. त्या वेळी पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी पवार यांना व्यासपीठावर जाऊन निवेदन देत संकरित भाकड जनावरे, संकरित जर्सी गायीचे गोऱ्हे यांची खरेदी–विक्री बंद होऊन आठवडे बाजार बंद झाल्याबाबत तसेच दुधातील भेसळ रोखण्याबाबतचे निवेदन देत चर्चा केली होती. तोच धागा पकडत भेसळखोरांवर कारवाईसाठी कायदा करण्याचे आणि येत्या कॅबिनेटच्या बैठकीत या विषयावर चर्चा व निर्णय घेण्यात येईल, असे पवार म्हणाले.

------------

### अखंड ओबीसीतील

नेते आणि विविध समाज संघटनेचे अध्यक्ष यांनी राज्यभर या निर्णयाविरुद्ध आंदोलन सुरू केले. शासनाने हा जीआर रद्द करावा अशी देखील मागणी केली. यापूर्वी दिलेल्या कुणबी नोंदीची तपासणी आणि श्वेतपत्रिका शासनाने जाहीर करावी, अशी देखील मागणी झाली. मात्र ज्या हैदराबाद गॅझेटचा आधार घेऊन आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला त्याच गॅझेटमध्ये वंजारी, बंजारा, धनगर आणि धोबी हा समाज एससी व एसटी या प्रवर्गात दाखवला गेला आहे. त्यानुसार ओबीसी समाजातील या जातींनी आपली वेगळी चूल मांडत वेगळी मागणी केली आहे. ओबीसी समाजाचे आरक्षण सुरक्षित रहावे यासाठी एकसंध असलेल्या ओबीसी मधील धनगर समाजाने एसटी मधून आरक्षण मिळावे यासाठी स्वतंत्र आंदोलन सुरू केले आहे. त्यासोबतच बंजारा समाजाने देखील एसटीमधून आरक्षण मिळावे म्हणून स्वतंत्र आंदोलन सुरू केले आहे. मात्र ओबीसी एकसंध आणि एकजुटीसाठी लढणारे लक्ष्मण हाके हे एकाकी पडल्याचे दिसून येत आहे. ओबीसी मधील महत्वाच्या दोन समाजाने स्वतंत्र मागणी करत स्वतंत्र आंदोलन सुरू केल्याने त्यांनी ओबीसी नेते हाके किंवा भुजबळ यांना बोलावले देखील नाही. त्यातच बीडमध्ये होऊ घातलेल्या समता परिषदेच्या अखंड ओबीसी एल्गार मेळाव्यासाठी हाके यांना निमंत्रण दिले गेले नाही. सद्या हा मेळावा रद्द झाला असला तरी त्यापूर्वी मात्र ओबीसीमध्ये फूट पडली असल्याची चर्चा सुरू झाली. एकंदरीत एकसंध वाटणारा ओबीसी समाज आणि त्यातील काही जाती आपल्या वेगळ्या हक्काच्या मागण्या मागत आहेत. ते गैर नाही जर गॅजेटमध्ये त्या त्या समाजाचा एससी एसटी असा उल्लेख असेल तर त्या गॅझेटनुसार किंवा उल्लेखानुसार समावेश होणे देखील गरजेचे आहे. मात्र यातून एक निश्चित सांगता येईल की, एकसंध वाटणारा ओबीसी आता वेगवेगळ्या वाटाने जाताना दिसत आहे. ओबीसी म्हणून लढणारा आणि या लढ्यात असलेल्या धनगर आणि बंजारा समाज स्वतंत्र एसटी प्रवर्गाची मागणी करत असल्याने त्यांनी अखंड ओबीसीच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्याचे देखील राज्यभर सुरू असलेल्या एकंदरीत आंदोलनाच्या परिस्थितीवरून दिसत आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून ओबीसी आरक्षण आंदोलनाची धार बोथट होण्याची शक्यता आहे.

cmyk

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ | ३

## थोडक्यात...

### आता जिल्ह्यातील एकही बालक दिव्यांग प्रमाणपत्रा पासून वंचित राहणार नाही

बीड । प्रतिनिधी

महा.राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशान्वये व न्या.आनंद यावलकर,अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हयातील १८ वर्ष वयाच्या आतील सर्व दिव्यांग बालकांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड व जिल्हा शासकीय रूग्णालय, बीड व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय जि. प.बीड यांच्या संयुक्त विदयमाने दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेमध्ये जिल्हा शासकीय रूग्णालय या ठिकाणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबीरामध्ये १८ वर्ष वयाच्या आतील सर्व दिव्यांग बालकांची मोफत तपासणी केली जाणार आहे. तसेच त्यांना दिव्यांगाचे प्रमाणपत्र देखील या ठिकाणी दिले जाणार आहे. तसेच सदर शिबीरामध्ये दिव्यांग बालकांकरिता असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी स्वतंत्र स्टॉल ठेवण्यात आला असून सदर स्टॉलच्या माध्यमातून सर्व शासकीय योजनांची माहिती दिव्यांग बालकांपर्यंत पोहोचविली जाणार आहे. तरी बीड जिल्हयातील जास्तीत जास्त पात्र दिव्यांग बालकांनी सदर शिबीरामध्ये सहभागी होवून विविध शासकीय योजनांची लाभ घ्यावा तसेच विविध तपासणी, दिव्यांग प्रमाणपत्र आदिंचा देखील सदर शिबीरामध्ये दिव्यांग बालकांना लाभ दिला जाणार आहे अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शन्या.डब्ल्यू.ए.सयद यांनी दिली आहे.

### छत्रपती शिवाजी विद्यालयाचे जलतरण स्पर्धेत यश

माजलगाव । प्रतिनिधी





क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे.

१०० मीटर बॅक स्ट्रोक या जलतरण प्रकारात ओमकार पठाडे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला तर ५० मीटर बटरफ्लाय या जलतरण प्रकारात ऋषिकेश हिंगण याने तृतीय क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक माधव घोलप यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, सतीश दुगड, ईनायत खान पठाण, दयानंद तोष्णीवाल, डॉ . योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, माधव घोलप, विष्णू गडकर, मुरलीधर भालशंकर, अनंत शेजुळ, सय्यद गयास, अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, मिलिंद देशपांडे, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, शेख शहाणूर, ज्ञानेश्वर पवार, फरजाना पठाण, सत्यप्रिया होके पाटील, शिल्पा शिनगारे , स्मिता डाके, दत्ता पांडे दिनकर काळे यांनी अभिनंदन केले आहे.

### धारूर ग्रामीण रुग्णालयात आरोग्य शिबिराचे आयोजन

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

**धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात स्वस्त नारी सशक्त परिवार या अभियाना अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन २९ सप्टेंबर रोजी करण्यात आले असून तज्ञ डॉक्टरांमार्फत या ठिकाणी रुग्णाची तपासणी केली जाणार आहे तरी या शिबिराचा लाभ शहर व तालुक्यातील गरजूंनी घ्यावा असे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ शशांक वाघमारे यांनी केले आहे.**

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन ''स्वस्थ नारी सशक्त परिवार '' या अभियाना अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी ग्रामीण रुग्णालय किल्ले धारूर या ठिकाणी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे .या शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ञ,बालरोग तज्ञ,नेत्र विकार तज्ञ,कान नाक घसा तज्ञ ,आणि दंत शल्य चिकित्सक या पाच ही तज्ञ डॉक्टरा मार्फत रुग्ण तपासणी करून त्यांच्यावर उपचार केले जाणार आहेत या शिबिराचा लाभ पूर्ण धारूर शहर आणि तालुक्यातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन धारूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शशांक वाघमारे यांनी केले आहे.

## गोट्या गीतेवर मोक्का अंतर्गत कारवाई

बीड । प्रतिनिधी

अनेक प्रकरणात सहभागी असलेला परळी येथील गोट्या उर्फ ज्ञानबा गीते व इतर चार आरोपीवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यास पोलीस महासंचालकांनी मंजुरी दिली आहे. या कायद्यांतर्गत पाच आरोपींच्या विरोधात मोक्का अंतर्गत २५ सप्टेंबरला आदेश देण्यात आले. परळी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत सहदेव वाल्मीक सातभाई यांना जलालपूर रोडच्या कमानी जवळ स्कार्पिओ आडवी लावून रघुनाथ फड व इतर सात ते आठ जणांनी मारहाण केली होती. त्यांच्याकडील दोन लाख ७० हजाराचा माल लंपास केला होता. या प्रकरणात विभागीय पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांच्याकडे मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. तत्कालीन तपास अधिकारी अनिल चोरमले यांच्याकडे हा तपास होता. या प्रकरणातील आरोपी रघुनाथ फड, ज्ञानोबा उर्फ गोट्या गीते, धनराज उर्फ राजेश फड, विलास गीते, जगन्नाथ फड ,बालाजी दहिफळे, सुदीप सोनवणे यांच्या विरुद्ध पुरावा उपलब्ध झाल्याने तपास अधिकारी ऋषिकेश शिंदे यांनी अप्पर पोलीस महासंचालकांकडे मक्कोका कायद्याअंतर्गत दोषारोप पत्र दाखल करून परवानगी मागण्यासाठी अहवाल सादर केला होता. ही परवानगी २८ ऑगस्ट २०२५ रोजी देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी या प्रकरणातील उर्वरित पाच आरोपी विरुद्ध मोका कायद्याअंतर्गत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी पुनरावलोकन होऊन परवानगी मिळण्यासाठी दिनांक २३ सप्टेंबर रोजी अहवाल पाठवला होता.

# ह.भ.प.निळकंठ महाराज यांचे वारकरी संप्रदायातील कौतुकास्पद कार्य -महंत आदिनाथ महाराज

आष्टी । प्रतिनिधी

सुर्य,हवा,पाणी,निसर्ग हे श्रीमंत व गरीबांना समान न्याय देत असतो.आईचे हृदय सर्व मुलासांठी समान प्रेम देणारे असते.तसेच हृदय संताचे असते.संतानी भक्ती केली आणि देवाने अनेक अवतार घेऊन चरित्र केले म्हणुन अलौकिक कार्य करणाऱ्यांचे अलौकिक कार्य आहे.संत व देवाचे चरित्र असते सामान्यांचे चरित्र नसते.संत,देव आणि अलौकिक कार्य करणाऱ्यांचेच चरित्र होत असते.आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथे वारकरी शिक्षण देणारी संस्था नावारूपाला आली आहे.

भागवताचार्य ह.भ.प.निळकंठ महाराज यांचे वारकरी संप्रदायातील कौतुकास्पद कार्य असल्याचे प्रतिपादन महंत आदिनाथ महाराज तारकेश्वरगडकर यांनी केले. आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील संत मदन महाराज वारकरी विद्यापीठ या संस्थेत नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चार दिवशीय सप्ताहात काल्याचे कीर्तन प्रसंगी महंत ह.भ.प.आदिनाथ महाराज तारकेश्वरगडकर बोलत होते.

यावेळी निळकंठ महाराज तावरे,ईश्वर महाराज कष्टे, पांडुरंग भालके महाराज, शाखाधिकारी राकेश शाही, उत्तम बोडखे,पोपट घुले,दिपक गदादे, सुनिल तोडकर,ताराचंद कानडे,गणपत गदादे,नवनाथ चांगणे सर,डा. दत्तात्रय भोसले आदि उपस्थित होते. महाप्रसादाची पंगत सरपंच अजित घुले यांची होती.



यावेळी महंत तारकेश्वरगडकर म्हणाले की,आपली इंद्रिय माणसाने आपल्या ताब्यात ठेवले पाहिजेत. भगवान परमात्म्याची सेवा आई-वडिलांची सेवा परोपकार हे करण्याचे कार्य मानवी जीवनामध्ये आपण केलं पाहिजे.आई भगवती, आई जगदंबेच्या कृपेने तिचे आपण सर्व लेकरं आहोत. तिची सेवा अनुष्ठान प्रत्येकाने केलं पाहिजे असे निरूपण महंत तारकेश्वरगडकर महाराजांनी केले. ह.भ.प.तावरे महाराज हे या गुरुकुलामध्ये संपूर्ण विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबर अध्यात्मिक शिक्षण देण्याचं कार्य करतात ही मुलं भविष्यामध्ये गुरुकुल २०१० पासून अत्यंत सुंदररीत्या कार्य करत आहेत. प्रत्येक उन्हाळ्यामध्ये वारकरी बाल संस्कार शिबिर, दिवाळीमध्ये सुद्धा वारकरी बालसंस्कार शिबिर तावरे महाराज आयोजित करतात.या गुरुकुलाच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थी घडत आहेत. भविष्यामध्ये घडत राहतील त्याकरता आपण सर्वांनी गुरुकुलाला सहकार्य करावं असेही आवाहन प्रेममुर्ती आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगडकर यांनी यावेळी केले. गुरुकुलाला सुद्धा स्वतः शास्त्री महाराज अन्नधान्य पुरवितात असं ह.भ.प. भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांनी सांगितले. गुरुवर्य पंढरपूरचे हरिभाऊ महाराज पाटील यांनी जे प्रेम केलं तेच प्रेम गुरुवर्य आदिनाथ शास्त्री तारकेश्वरगडकर या गुरुकुलावर व माझ्यावर करतात असेही ह.भ.प.तावरे महाराज यांनी सांगितले.पुढे महंत आदिनाथ महाराज तारकेश्वरगडकर म्हणाले की,साधु,संतांच्या कृपाशीर्वादाने आपले जीवन कृतार्थ करावे.आपण राष्ट्रसंत भगवानबाबा आणि राष्ट्रसंत वामनभाऊ यांच्या पावन भुमीत आपण जन्मलो हे आपले परमभाग्य आहे.लोभ नसलेले,निष्काम व लोकहितासाठी झटणा-यांच्याचा मागे समाज येत असतो.नवविधा भक्ती ज्या घरात होत असते तेथे भगवंताचे आगमन होत असते.काम क्रोध व लोभ हे तीन विकारा गेल्या शिवाय खरी देवाची भक्ती करता येत नाही.संत हे जगताच्या.उध्दारासाठी, हितिसाठी मृत्यू लोकात येतात. गुरु देवापेक्षा श्रेष्ठ असतो,गुरुची निंदा केलेली सहन करु नये असे महंत तारकेश्वरगडकर यांनी सांगितले.श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्थाने शारदीय नवरात्र महोत्सव सोहळा केला होता. या महोत्सवाचे यंदाचे ५ वे. वर्षे आहे.यावर्षी २२ सप्टेंबर रोजी श्रीमद्? देवी भागवत महापुराण कथा संपन्न झाली. कथा प्रवक्ते ह.भ.प.भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांची श्रीमद्? देवी भागवत कथा संपन्न झाली. २६ सप्टेंबर रोजी या शारदीय नवरात्र महोत्सवाचा समारोप तारकेश्वरगडाचे महंत शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगडकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. श्रीमद देवी भागवत महापुराण खूप कमी ठिकाणी या भागवताची कथा श्रवण करता येते. फराळाची पंगत नेमीचंद परदेशी (कडा),सुरेश बापू कदम,नवनाथ अनारसे, पवार वस्ती, सावळीराम कुलवडे व सरपंच अजित घुले यांनी महाप्रसादाची पंगत दिली.

## पाटोद्यावर अस्मानी संकट! तहसीलदार निलावाड यांनी नागरिकांना दिला आधार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यावर अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात रस्ते, गल्ल्या आणि घरे पाण्याखाली बुडाले. नागरिक त्रस्त झाले, भय आणि अडचणींनी शहर व्यापले. रस्त्यांवर वाहतूक



अडचणींनी थांबली, तर अनेक घरांमध्ये पाणी शिरले.अशा कठीण प्रसंगात तहसीलदार निलावड साहेब खंबीरपणे नागरिकांच्या पाठीशी उभे राहिले आणि संकटमोचनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी संकटात धैर्य दाखवून नागरिकांना आधार दिला आणि प्रशासनाच्या विश्वासाला बळकटी दिली.नागरिकांच्या समस्या त्वरित सोडवण्याचे काम करत तत्परता आणि कामगिरी संकटावर मात! धैर्य आणि समर्पण संकटाच्या काळात तहसीलदारांनी नागरिकांना धीर दिला. मदत करण्यासाठी टीमचे संयोजन केले आणि नागरिकासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वामुळे नागरिकांचा आत्मविश्वास वाढला, संकटावर मात करण्याची ऊर्जा मिळाली. संकटात धैर्य, नागरिकांना आधार!'' देत जनसेवेचा संदेश तहसीलदार निलावड साहेबांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवले की जनसेवा हेच खरे ध्येय आहे. त्यांनी संकटमोचनात आपल्या कर्तव्याची जबाबदारी पार पाडली,नागरिकांसाठी स्वतःची धैर्य दाखवले आणि सेवा सर्वोपरि ठेवली व जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा! दाखवून दिलीनागरिकांचा विश्वास आणि कौतुक स्थानिक नागरिकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. त्यांच्या धैर्य, समर्पण आणि तत्परतेमुळे शहरात विश्वास, सकारात्मक ऊर्जा आणि मदतीची भावना पसरली आहे.संकटात धैर्य, तत्परता, जनसेवा आणि नेतृत्व या चार गोष्टींचा संगम पाहायला मिळाला. तहसीलदार निलावड साहेब हे शहरातील नागरिकांसाठी खरे प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. त्यांच्या कार्याने संकटात नागरिकांना मदत मिळाली आणि प्रशासनाच्या कार्यावर विश्वास वाढला.

## अ.भा.मराठी पत्रकार परिषद यावर्षी पासून समाजसेवेसाठी पुरस्कार देणार

मुंबई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पत्रकारितेत देदीप्यमान कामगिरी करणारया पत्रकारांना विविध पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मानित केले जाते..



यावर्षी पासून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारया व्यक्तींना ''लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक -शैक्षणिक सेवा गौरव'' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.. ५१,१११ रूपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.. रामशेठ ठाकूर यांनी परिषदेकडे ठेवलेल्या ठेवीतून हा पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केली आहे ..फेब्रुवारी २०२६ मध्ये यंदाचे पुरस्कार दिले जातील. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेकडे विविध मान्यवरांनी ठेवलेल्या ठेवीच्या व्याजातून दरवर्षी १० पत्रकारांचा गौरव केला जातो.. यामध्ये परिषद स्वतःच्या निधीतून एका ज्येष्ठ पत्रकाराचा ''आचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार'' देऊन गौरव करीत असते.. २५ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असते..

यावर्षी पासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारया एका मान्यवर व्यक्तीचा ''लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक सेवा गौरव पुरस्कार'' देऊन सन्मान केला जाणार आहे.. एक निवड समिती पुरस्कार्थींची निवड करते. पत्रकारितेच्या क्षेत्रात परिषदेचे पुरस्कार मानाचे समजले जातात.. यापुढे एका समाजसेवकाचा सन्मान परिषदेच्या या पुरस्कारांची उंची वाढवणार आहे. एस.एम.देशमुख, मिलिंद अष्टीवकर आणि पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी नुकतीच पनवेल येथे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली..

## धनगर समाजाचे एसटी आरक्षणासाठी माजलगावात तहसीलसमोर धरणे आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी जालना येथे आमरण उपोषणास बसलेले दीपक भाऊ बोराडे यांच्या समर्थनार्थ माजलगाव तहसील कार्यालयासमोर समोर सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने दि.२६ सप्टेंबर रोजी धरणे आंदोलन करण्यात आले.

धनगर समाजाचा एसटी आरक्षणाचा लढा गेल्या अनेक वर्षापासून शासन दरबारी व न्यायालयात सुरू आहे परंतु आजपर्यंतच्या शासनकर्त्यांनी या धनगर समाजाचा मतदानापुरता वापर करून घेतला आहे. या प्रश्नाला आजपर्यंत दुर्लक्ष केले केलेले आहे. धनगर समाजाला




एसटी आरक्षण लागू करावे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी जालना येथे धनगर समाजाचे भूषण असलेले दीपक भाऊ बोराडे यांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. त्या उपोषणाच्या समर्थनार्थ माजलगाव तहसील कार्यालयासमोर दिनांक २६ सप्टेंबर रोजी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने एक दिवशीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सकाळी अकरा वाजल्यापासून ते सायंकाळी सहा पर्यंत शेकडो समाज बांधव सहभागी झाले होते.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा आनंद सक्राते जलतरण स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

माजलगाव । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि २४ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा खेळाडू आनंद एकनाथ सक्राते ४०० मी.फ्रीस्टाईल व ४०० मी. वैयक्तिक मिडले मध्ये प्रथम आला असून,त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.आनंद सक्राते याला प्रा. नवनाथ आवारे,प्रा. प्रविण कोरडे,प्रा. चंद्रकांत फड,यांचे मार्गदर्शन लाभले.



यशस्वी खेळाडू आनंद सक्राते.याचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे,पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे,प्रा. एस.एस.टाक.प्रा सुदर्शन स्वामी, प्रबंधक प्रशांत चव्हाण,अधीक्षक के.बी.भोंडवे यांनी अभिनंदन केले.

## पिकांचे पाहणी दौरे बंद करून शेतकऱ्यांना मदत करा -जाधव

पाटोदा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यासह पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पिके अक्षरशः नेस्तनाबूत झाली आहेत. गेल्या काही दिवसांपासून आमदार, खासदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पाहणी दौरे सुरू आहेत. मात्र, कोरड्या आश्वासनापलीकडे अद्याप शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही.



यामुळे हे पाहणी दौरे थांबवून तालुक्यासह जिल्ह्यात तातडीने 'ओला दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शासनाकडे केली आहे.

यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकवेळा ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. बहुतांश शेतकऱ्यांची पिके वाहून गेली असून शेती खरडून गेली आहे. उरलेली पिकेही पावसामुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने पाहणी पंचनाम्यांमध्ये वेळ न घालवता शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिधद्धारे केली.

तसेच मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ घोषित करून पिक विमा कंपन्यांना तातडीने विमा रक्कम वितरित करण्याचे निर्देश द्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत वरद लांडगे प्रथम; शाळेत गौरव समारोह

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

येथील न्यू हायस्कूल शाळेचा कर्तृत्ववान विद्यार्थी चि. वरद श्रीराम लांडगे (वर्ग ८ वी) याने आपल्या उत्तुंग कामगिरीने शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करत जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर प्रकारात वरदने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला असून आता तो होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर प्रकारात वरदने अविश्रांत मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रथम




क्रमांक पटकावला. या यशामुळे त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, हा क्षण संपूर्ण शाळेसाठी आणि पालकांसाठी अभिमानाचा ठरला आहे. वरदचे यश हे त्याच्या मेहनतीचे, शिस्तीचे व खेळावरील प्रेमाचे फलित आहे. या स्पर्धेसाठी त्याला न्यू हायस्कूलचे क्रीडा शिक्षक वानखेडे सर, स्विमिंग कोच संजय भगत, गणेश मुंडे, वैजनाथ वेरुळे, रमेश चाटे आदींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी क्रीडा विभागाचे हौसळकर सर, एस एफ आय चे सचिन मंजुळे, शैलेश चव्हाण आदींनी वरदला पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

न्यू हायस्कूल शाळेत गौरव समारंभ संपन्न

चि. वरद श्रीराम लांडगे यांने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव माननीय आमदार सतीशभाऊ चव्हाण तसेच शालेय समिती परळी वैजनाथचे अध्यक्ष नानासाहेब (काका) सोळंके यांनीदेखील कौतुक व्यक्त केले असून त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. न्यू हायस्कूल शाळेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. मोरे, के. व्ही., पर्यवेक्षिका सौ. छाया देशमुख, क्रीडा शिक्षक श्री. नारायण वानखेडे, ज्येष्ठ शिक्षक श्री. शहापूरे सर अमर देशमुख सर व शिंदे डी. एम. सर आदीनी त्याचा सत्कार केला. मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, सहाध्यायी व क्रीडा प्रेमी यांनी वरदचा सत्कार करत त्यास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.वरदच्या या कामगिरीमुळे शाळा, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधान व अभिमान व्यक्त होत असून विभागीय स्तरावरील त्याच्या सहभागाबाबत सर्वांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

## बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे यावर्षीचे संपुर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा -भैय्यासाहेब तांगडे

**वडवणी । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या आठवडाभरापासून पावसाने सारांश थैमान घातले होते. यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान देखील झाले आहे. हे नुकसान लवकर भरून येणे शक्य नसल्याने आर्थिक संकट देखील कोसळले असल्याने मराठवाड्यातील स्व-बाहेर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यंदाचे शैक्षणिक शुल्क माफ करावे. या मागणीसह राज्य सरकार मधील सर्व मंत्र्यांसह केंद्र सरकार मधील राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, विद्यमान लोकप्रतिनिधीचे तीन महिन्यांचे वेतन कपात करून हा निधी पूरग्रस्त भागात व शेतकऱ्याच्या मदतीसाठी वापरावा. अशी मागणी वडवणी येथील पत्रकार भैय्यासाहेब तांगडे यांनी केली आहे.**



बीड जिल्ह्यासह मराठवाडा व अन्य जिल्ह्यात देखील पावसाने हहाकार केला आहे. पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे 'होत्याचं नव्हतं' झालं आहे. शेतात सोयाबीन, बाजरी, तुरसह अन्य खरीप पिके हि पाण्याखाली नेस्ताभूत झाली आहेत. यामुळे शेतकरी राजा आर्थिक कचाट्यात सापडला आहे. इतर नुकसान देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. फक्त मदत देऊनच हे नुकसान भरून येईल असे नाही. तर या ठिकाणच्या नागरिकांचे मनोबल देखील खचले आहे. सरकारकडून मदतीची अपेक्षा असून प्रशासनाकडून पंचनामा करण्याचे ढोंग सध्या तरी दिसून येत आहे. हे काम पूर्ण झाल्या नंतरच मदत मिळेल तेव्हा मिळेल. परंतु सध्या बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात ज्या ठिकाणी प्रचंड पाऊस झाला आहे. त्या ठिकाणचे विद्यार्थी स्व-बाहेर जिल्ह्यात हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत आहेत. शिक्षणाची फीस कशी आणि कुठून भरावी ? असा गंभीर प्रश्न सध्या तरी पालकांपुढे उभा असून सरकारने मदत होईल तेव्हा होईल परंतु शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे यावर्षीचे इयत्ता दहावी व बारावी स्टेट बोर्डासह व्यवसायिक शिक्षणासोबत, पदवी व पदव्युत्तर अन्य सर्व शिक्षणाचे शैक्षणिक शुल्क सरकारने निस्वार्थपणे माफ करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावावा तसेच राज्य सरकारमधील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संपूर्ण मंत्रिमंडळ व दोन्ही सभागृहातील आजी-माजी आमदार, लोकप्रतिनिधीं तसेच केंद्र सरकारमधील राज्यातील मंत्री व आजी-माजी खासदार लोकप्रतिनिधींचे तीन महिन्यांचे वेतन सरकारने कपात करून हा पूरग्रस्त व शेतकरी राजाच्या उभारणीसाठी या निधीचा वापर करावा. व या लोकप्रतिनिधींनी देखील मनाचा मोठेपणा दाखवत तीन महिन्याचे वेतन नाकारावे हीच खरी समाज व देशसेवा ठरेल. अशी मागणी वडवणी येथील पत्रकार भैय्यासाहेब तांगडे यांनी केली आहे. तर शैक्षणिक शुल्क माफ करावे या मागणीचे निवेदन ईमेलद्वारे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व ना. अजित पवार, बीडचे जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे.

### टी.सी.हरवला आहे

शिवकन्या उद्धव शेकडे या नावाचा बारावी पास चा टीसी कडा ते गहूखेल प्रवासादरम्यान हरवला आहे सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**-::संपर्क::-**

**मो. ९४०४८०७३७३**

cmyk




# शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश; राज्य सरकारचे निर्देश

पुणे : महाराष्ट्र राज्य सरकारने शाळांमध्ये कृषी हा विषय पहिली ते दहावीपर्यंत टप्प्याने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून (२०२५-२६) पहिली इयत्तेपासून या योजनेची अंमलबजावणी सुरू होणार असून, त्यासाठी शुक्रवारी मंत्रालयात शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

विद्यार्थ्यांना माती, पाणी, नैसर्गिक संसाधने, वनस्पती आणि प्राणी यांच्याबद्दल शिक्षण देण्यासोबतच तंत्रज्ञान आणि नवनवीन कल्पनांचा परिचय करून देण्यावर भर देण्यात येईल. सहावी ते दहावी इयत्तांसाठी सेंद्रिय शेती, एआय, पर्यटन आदी विषयांचा समावेश असलेला अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहे. या बैठकीला उपसचिव तुषार महाजन, माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालेकर, संयुक्त संचालक हरून अत्तर यांनी हजेरी लावली. मंत्री भोयर म्हणाले, ''कृषी हे आपल्या देशातील मुख्य क्षेत्र आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना



माती, पाणी, नैसर्गिक संसाधने, वनस्पती आणि प्राणी यांच्याबद्दल माहिती मिळणे गरजेचे आहे. यासोबतच नवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन कल्पनांचाही परिचय त्यांना करून द्यावा.'' सहावी ते दहावी इयत्तांसाठी तयार करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात अनेक रोचक आणि उपयुक्त विषयांचा समावेश असेल. यात घरच्या अंगणातील बागा (किचन गार्डन), सेंद्रिय शेती, बाजरीसारख्या भरडधान्यांचे उत्पादन, अन्न प्रक्रिया, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), बांबूचा उपयोग, प्राण्यांचे पोषण, कुक्कुटपालन, पर्यटन आणि आतिथ्य व्यवसाय, पाण्याचे ऑडिट, जैवविविधता नोंदणी आणि धूररहित स्वयंपाक यांचा समावेश आहे. भोयर यांनी सांगितले की, ''पारंपरिक शेतीला आधुनिक साधनांचा वापर कसा करता येईल, याचे उदाहरण विद्यार्थ्यांना दाखवणे हा मुख्य उद्देश आहे. विशेषतः एआय सारख्या तंत्रज्ञानाचा शेतीत कसा फायदा होऊ शकतो, हे शिकवले जाईल.''

**२०२५ साठीचा नवीन अभ्यासक्रम अंतिम टप्प्यात**

मंत्री भोयर यांनी आणखी सांगितले की, २०२५ साठीचा नवीन अभ्यासक्रम अंतिम टप्प्यात आहे. यात ३ ते ८ वर्षांच्या मुलांसाठी मूलभूत शिक्षण, २१ व्या शतकातील कौशल्ये आणि कृषी तसेच पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक आधार तयार करण्यावर भर देण्यात येईल. अभ्यासक्रमातील धडे स्थानिक सण, पिके, भूगोल आणि परंपरा यांच्याशी जोडलेले असतील. यामुळे विद्यार्थी लहानपणापासूनच आपल्या संस्कृतीशी जोडले जातील आणि शेतीशी त्यांचा संबंध अधिक दृढ होईल. अशा प्रकारे शिक्षणाला व्यावहारिक आणि सांस्कृतिक आधार देण्याचा प्रयत्न आहे, जेणेकरून भविष्यातील पिढ्या कृषी क्षेत्राकडे आकर्षित होतील असं ते म्हणाले.

## बांबू शेतीसाठी वापरा कलर कोड पद्धत; विक्रीसाठी होतो मोठा फायदा!



महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे डोंगरपायथ्याला असलेले किंवा दुर्गम भागातील शेतकरी बांबूची शेती करतात. अजूनही बांबूला म्हणावे तेवढे व्यावसायिक स्वरूप प्राप्त झालेले नाही. तरीही कोकणातील काही भाग, पश्चिम महाराष्ट्रातील भोर, वेल्हा आणि पूर्व महाराष्ट्र म्हणजेच विदर्भातील काही भागात बांबूचे उत्पादन घेतले जाते. सरकारकडूनही आता बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. बांबू शेतीमध्ये आता कलर कोड पद्धत नव्याने रूजू होत आहे. नेमकी काय असते? आणि तिचा बांबू विक्रीसाठी कसा फायदा होतो? याबाबत सविस्तरपणे माहिती जाणून घेतल्या याचा चांगला फायदा होईल.

अपरिपक्व बांबूमुळे शेतकऱ्यांना फटका : बांबू मार्केटमध्ये विक्रीसाठी गेल्यावर तो बांबू अपरिपक्व असल्याचे सांगून शेतकऱ्यांना कमी दर दिला जातो. यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. कारण बांबू वाळल्यानंतर आपण तो अपरिपक्व आहे की परिपक्व आहे? हे रंगावरून ओळखू शकत नाही. पण अपरिपक्व बांबूवर चिरा पडल्यामुळे ते वाया जातात. अपरिपक्व बांबू ओळखण्यासाठी आणि बांबूचे वय कळण्यासाठी बांबूला रंग देण्याची पद्धत आता महाराष्ट्रातही रुजू लागली असून, यामुळे बांबूचे वय मोजण्यास मदत होते. त्याचबरोबर काढणीवेळी अपरिपक्व बांबू काढले जात नाहीत. म्हणून बाजारातही अपरिपक्व बांबू विक्रीसाठी जात नाही.

अशी केली जाते कलर कोडिंग : एका बेटामध्ये साधारण दहा बारा किंवा त्यापेक्षा जास्त बांबू असू शकतात. पण हे बांबू एकाच वयाचे नसतात. यातील काही एक तर काही सहा महिन्याचे असतात. या बांबूच्या वयानुसार त्याला रंग दिले जातात. पांढरा, लाल, निळा या रंगाचा वापर केला जातो. यामध्ये ठराविक वयोगटातील बांबूंना एकसारखे रंग दिले जातात. त्यामुळे बांबूचे वय ओळखता येते. बांबूला व्यवसायिक स्वरूप हळूहळू येत असून, अनेक शेतकरी कलर कोडिंगचा वापर करायला सुरूवात करत आहेत.

## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव अन एकात्मिक नियंत्रण

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांचेमार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो

सुत्रकृमीच्या गाठी अशा ओळखा : सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.




पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळया वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

# राज्यात मुसळधार पावसाने मक्यावर लष्करी अळी

मागील काही दिवस राज्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. अशा वातावरणात मक्यावर विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव होतो. शेतकरी एकात्मिक पद्धतीने आणि योग्य उपाययोजनांच्या आधारे मका पिकाचे रक्षण करु शकतात आणि उत्पादन वाचवू शकतात.

लष्करी अळी : मक्यावरील लष्करी अळी मुख्यत: पानांवर हल्ला करते. ती पाने कुरतडून छिद्रे तयार करते. मादी पतंग पानांच्या मागे अंडी घालतात, त्या अंड्यांवर राखाडी रंगाची केसांसारखी आवरणे असतात. अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकाची वाढ खुंटते आणि कणसांचे उत्पादन घटते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार नियंत्रणाचे उपाय दिलेले आहेत.

नियंत्रण :मित्र कीटकांचे संवर्धन करावे. अंडीपुंज, समूहातील अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. सर्वेक्षणआसाठी ५ कामगंध सापळे प्रती एकरी लावावेत. ट्रायकोग्रामा प्रीटीओसम किंवा टिलेनोमस रेमस यांची परोपजीवीग्रस्त ५०,००० अंडी प्रती एकर एक आठवड्याच्या अंतराने ३ वेळा सोडावे. मेटाऱ्हायझियम ॲनिसोपली ५० ग्रॅम किंवा नोमुरिया रिलाई ५० ग्रॅम किंवा बॅसिलस थुरिन्जिएन्सिस २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. निंबोळी अर्काची ५ टक्के किंवा ॲझाडिरॅक्टीन १५०० पीपीएम ५० मिलि प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. स्पिनेटोरम ११.७% एससी ५ मिलि किंवा ब्रोफ्लानिलाइड २० % २.५ मिलि किंवा आयसोसायक्लोसेरॅम १८.१ एससी ६ मिली किंवा



इमामेक्टिन बेंझोएट १.५% प्रोफेनोफोस ३५% डब्लूडीजी १५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट करावे.कणसे पोखरणारी अळी : फुलोरा आणि कणीस पिकण्याच्या अवस्थेत कणसे पोखरणारी अळी म्हणजेच हेलिकव्हर्पा आर्मिजेरा अळी मक्यावर आक्रमण करते. ही अळी कणसाला पोखरुन आतील दाणे खाते आणि पिकाचे नुकसान करते.

नियंत्रण : पिकांचे आणि इतर पर्यायी कीड वाढणाऱ्या झाडांचे अवशेष नष्ट करावेत. तसेच सुप्तावस्थेत अळी असलेले खोड छाटावे. अळी वेचून नष्ट कराव्यात. या अळीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चीलोनिस या परोपजीवीचे अंडी असलेले ८ कार्ड प्रती हेक्टरी लावावेत. एच.ए.एन.पी.व्ही. २५० एल ई प्रती हेक्टरी वापरावे.

करपा : थंड आणि जास्त आर्द्रता असलेल्या वातावरणात या रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. करपा रोगाचे दोन प्रकार पहायला मिळतात, उत्तरीय करपा आणि दक्षिणीय करपा. पानांवर लांब अंडाकृती, करड्या-हिरव्या रांगाच्या २.५ ते १५ सेमी अंतराच्या चिरा दिसून येतात. पानांच्या शिरांमध्ये लांबट तपकिरी किंवा गडद लालसर तपकिरी रंगाच्या चिरा दिसून येतात.

नियंत्रण : करपा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब / झायनेब २.५ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा कार्बेन्डाझीम १२ %+ मॅन्कोझेब ६३% डब्ल्यू. पी. २ ग्रॅम किंवा ॲझाक्झिस्ट्रोबीन १८.२ % + डायफेनकोनॅझोल ११.४ % एस.सी १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फुलोऱ्यापूर्वी खोड कुजव्या रोग : हा रोग अधिक उष्णता आणि अधिक आर्द्रता असलेल्या हवामान आढळतो. या रोगाचा प्रादुर्भाव झालेला खोडाचा भाग तपकिरी रंगाचा, आकसलेला आणि मऊ होतो. जमीन व पहिल्या पेराच्या ठिकाणी पिकाला पीळ बसून झाड कोलमडते. पानाचा देठ व खोडावर चिरा दिसतात. त्यानंतर झाड ताबडतोब खाली पडून शेतामध्ये विखुरलेले होते. रोगट झाडाचा शेंडा झाडापासून सहज वेगळा होतो.

व्यवस्थापन : शेतात उत्तम निचऱ्याची सोय करावी. रोगाची लक्षणे दिसताच मेटॅलॅक्झील + मन्कोझेब हे संयुक्त बुरशीनाशक २ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.

फुलोऱ्यानंतरचा खोड कुजव्या रोग : मक्याचे पीक फुलोऱ्यात असताना मूळ, शेंडा आणि खालील पेरांवर या रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. खोडाला मधून कापल्यास आतील भाग गुलाबी - जांभळा / काळ्या रंगाचा दिसतो. प्रादुर्भाव मूळ, खालील पेरे व शेंड्यावर होतो त्यामुळे झाड वाळते.

उपाययोजना : नत्र, स्फुरद, व पालाशची योग्य मात्रा द्यावी. पिक फुलोऱ्यात असताना पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. या रोगाची लक्षणे दिसताच १० ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रतिकिलो शेणखतामध्ये मिसळावी. हे मिश्रण १० दिवसांनी सरी वरंब्यामध्ये पसरावे.




**जागतिक दिवस:**
**जागतिक रेबीज दिन**
**जागतिक कर्णबधिर दिन**
**आंतरराष्ट्रीय सुरक्षित गर्भपात दिन**

### महत्वाच्या घटना

१८३७ : साली अंतिम भारतीय मुघल सम्राट बहादूर शहा द्वितीय दिल्ली येथील सम्राट बनले.
१९२४ : पहिली पृथ्वी प्रदक्षिणा करणारी विमान फेरी पूर्ण झाली.
१९२८ : सर अलेक्झांडर फ्लेमिंग यांना आपल्या प्रयोगशाळेत एका विशिष्ट प्रकारच्या जीवाणूंची वाढ होताना आढळली. यातुनच पुढे 'पेनिसिलीन' या प्रतिजैविकाचा शोध लागला.
१९३९ : दुसरे महायुद्ध वॉर्सॉने नाझी जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५० : इंडोनेशियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९५८ : साली फ्रांस देशांत संविधान आमलात आणण्यास मंजुरी देण्यात आली.
१९६० : माली आणि सेनेगलचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९९ : महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना जाहीर
२००० : विख्यात नाटककार आणि साहित्यिक विजय तेंडुलकर यांना 'विष्णूदास भावे गौरव पुरस्कार' जाहीर
२००२ : सलमान खान यांच्या पांढऱ्या टोयोटा लँडक्रुझर गाडीचा वांद्रे येथे अपघात, अपघातात १ मृत्यू टर ४ गंभीर जखमी. सलमान खानच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले. पोलिसांकडून अटक व जमीन वर सुटका.
२००८ : साली स्पेसएक्स कंपनीने बनविलेले फाल्कन १ हे यान पृथ्वीच्या कक्षेत जाणारे पहिले खासगी-विकसित द्रव-इंधन प्रक्षेपण वाहन बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०३ : प्रॉस्पर मेरिमी फ्रेंच कथालेखक, नाटककार, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (मृत्यू: २३ सप्टेंबर १८७०)
१८३६ : बॉलकोक चे संशोधकथॉमस क्रैपर यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९१०)
१८६७ : जपानी पंतप्रधान कीचिरो हिरानुमा यांचा जन्म.
१८९८ : शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार, हिंदू महसभेचे अध्यक्ष, देवनागरी लिपी बसवणारे म्हणून त्यांनी लौकिक मिळवला
१९०७ : भगत सिंग क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९०९ : पी. जयराज मूकपटांच्या जमान्यापासून हिन्दी चित्रपटसृष्टीचे साक्षीदार असलेले दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९८०) अभिनेते (मृत्यू: ११ ऑगस्ट २०००)
१९२५ : अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ सेमूर क्रे यांचा जन्म.
१९२९ : लता मंगेशकर सर्वाधिक गाणी गाण्याचा विक्रम असलेली पार्श्वगायिका, भारतरत्न, दादासहेब फाळके पुरस्कार, पद्मभूषण
१९६६ : भारतीय दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक पुरी जगन्नाथ यांचा जन्म.
१९४६ : माजिद खान पाकिस्तानी क्रिकेट कप्तान
१९४७ : शेख हसीना बांगलादेशच्या १० व्या पंतप्रधान
१९४९ : साली भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी वे४० सरन्यायाधीश राजेंद्रमल लोढा यांचा जन्मदिन.
१९८२ : अभिनव बिंद्रा ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक मिळवणारा पहिला भारतीय
१९८२ : रणबीर कपूर अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३७ : साली भारतातील शेवटचे मुघल शासक बादशहा अकबर द्वितीय यांचे निधन.
१८९५ : लुई पाश्चर फ्रेन्च सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २७ डिसेंबर १८२२)
१९३५ : कायनेटोस्कोप चे संशोधक विल्यम केनेडी डिक्सन यांचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १८६०)
१९५३ : एडविन हबल अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २० नोव्हेंबर १८८९)
१९५६ : विल्यम बोईंग बोईंग विमान कंपनीचे संस्थापक (जन्म: १ आक्टोबर १८८१)
१९७० : इजिप्तचे दुसरे राष्ट्राध्यक्ष गमाल अब्दल नासर यांचे निधन.
१९८१ : व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष रोम्लो बेटानको यु र्ट यांचे निधन.
१९८९ : फर्डिनांड मार्कोस फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ११ सप्टेंबर १९१७)
१९९१ : अमेरिकन जॅझ संगीतकार माइल्स डेव्हिस यांचे निधन.
१९९२ : मेजर ग. स. ठोसर पानशेत पूरग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी दीर्घकाळ लढा देणारे
१९९४ : भारतीय चित्रपट अभिनेते आणि कॉमेडियन के. ए. थांगवेलू यांचे निधन. (जन्म: १५ जानेवारी १९१७)
२००० : श्रीधरपंत दाते सोलापूरचे प्रसिद्ध पंचांगकर्ते
२००४ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (जन्म: १२ डिसेंबर १९०५)
२०१२ : ब्रजेश मिश्रा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (जन्म: २९ सप्टेंबर १९२८)
२०१२ : माधव एस. शिंदे प्रख्यात चित्रपट संकलक (शोले, सीता और गीता, शान, रझिया सुलतान, सोहनी महिवाल, सागर, चमत्कार), फिल्मफेअर सर्वोत्तम चित्रपट संकलक पारितोषिक विजेते (शोले १९७५) (जन्म:१९२९)
२०१५ : साली साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, शैक्षणिक आणि पत्रकार वीरेन डंगवाल यांचे निधन.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# बळीराजा अडचणीत तर देश अडचणीत -ॲड. अरुण जाधव

## जामखेडसह राज्यभर ओला दुष्काळ जाहीर करा वंचित बहुजन आघाडीची जोरदार मागणी

जामखेड। प्रतिनिधी

बळीराजा अडचणीत तर देश अडचणीत आहे, देशातील अर्थव्यवस्था अडचणीत आहे,'' असे सांगत वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव यांनी शासनाला जाब विचारला. शेतकऱ्यांचे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून घरे, जीवनावश्यक वस्तू तसेच हातावर पोट असलेल्या सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. ''माणसाबरोबर जनावरंही मरण पावली आहेत. प्रत्यक्ष जाऊन अधिकाऱ्यांनी पाहणी करून सरसकट पंचनामे करावेत आणि तातडीने मदत जाहीर करावी,'' अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली. दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसील कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली. राज्य प्रवक्ते ॲड.अरुण जाधव यांच्या नेतृत्वाखाली प्रभारी



तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक दिवसांपासून सुरू असलेला पाऊस अद्यापही थांबलेला नाही. अनेक गावे पाण्याखाली गेली आहेत, तर जामखेड तालुक्यात पावसाने उच्चांक गाठला आहे. सोयाबीन, कांदा व फळबागांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी व गोरगरीब लोकांचा संसार अक्षरशः उघड्यावर आला आहे. त्यामुळे जामखेड तालुक्यासह राज्यभर शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी आणि राज्यभर ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी लोकाधिकार आंदोलन राज्य प्रवक्ते बापूसाहेब ओहोळ म्हणाले, ''शेतकऱ्यांनी शेतीसाठी कर्ज काढून केलेला खर्च पाण्यात गेल्याने शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. शासनाने जामखेड तालुका ओला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना तातडीची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.यावेळी आझाद क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष पोपटराव फुले यांनी मनोगत व्यक्त केले. या निदर्शनावेळी लोक अधिकार आंदोलनाचे प्रवक्ते बापूसाहेब ओहोळ, वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष आतिश पारवे, आझाद क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष पोपटराव फुले, राजू शिंदे, ऋषिकेश गायकवाड, रेश्मा बागवान, कृष्णा मोरे, नागेश फुले, प्रवीण गायकवाड, अनिल कांबळे, योगेश फुले, संदीप सांगळे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १९ प्रकारच्या शासकीय सेवा मिळणार घरपोच

## जालन्यापासून महाराष्ट्रात डिजिटल युगाची नवी सुरुवात

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्रात डिजिटल युगाची नवी सुरुवात जालना जिल्ह्यात झाली आहे. जिल्हा प्रशासनाने सुरु केलेल्या ₹जालना मित्र पोर्टलर मुळे नागरिकांना तब्बल १९ शासकीय सेवा घरबसल्या मिळणार आहेत, केवळ १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरून आता आधार कार्डपासून वृद्धत्व पेन्शनपर्यंतची कामे नागरिकांच्या घरीच पूर्ण केली जाणार आहेत. या उपक्रमामध्ये राज्यात जालना जिल्हा हा पहिला 'डिजिटल जिल्हा' होण्याकडे वाटचाल करीत आहे.



जालना मित्र पोर्टलच्या माध्यमातून ही सेवा असणार आहे. शासकीय कामासाठी विविध कार्यालयात सामान्य नागरिकांना तीन ते चार तास रांगेत उभे रहावे लागते. शासकीय कार्यालयात अनेक फेऱ्या मारण्यात वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होती. आता शासन आपल्या दारी यामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा नागरीकांना घरपोच मिळाव्यात यासाठी जालना जिल्ह्याने 'जालना मित्र पोर्टल' हा नावीन्य पूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तयार केला आहे. अशी माहिती देण्यात आली आहे. 'जालना सेवा पोर्टलवर नागरिकांनी कामासंबंधी या पोर्टलवर जावून अपॉइंटमेंट बुक करा.पोर्टलवरील १३ विभाग अन्न व नागरी पुरवठा विभाग, पासपोर्ट-परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, पोलिस / गृह विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, आयकर विभाग, ग्रामीण विकास विभाग, भूमी अभिलेख, सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग, डिजिटल जीवन प्रमाण, महसूल, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय या विभागाचा समावेश शंभर रुपये अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आपले सरकार सेवा केंद्रात भरता येईल अर्ज 'जालना मित्र' या पोर्टलमध्ये नागरिक स्वतः नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्राची अपॉइंटमेंट घेवू शकतात, त्याप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रचालक संबंधित नागरिकाच्या घरी जावून सर्व कागदपत्रे घेवून आपले अर्ज भरून घेतील, यासाठी नागरिकांनी आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे लॉगिन करायचे आहे. आपल्याला ज्या विभागाशी निगडित काम आहे, तो विभाग निवडून, त्या विभागातील सेवा निवडायची आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा, राष्ट्रवादीने रोखला राष्ट्रीय महामार्ग

धाराशिव। प्रतिनिधी

जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने येडशी चौरस्त्यावर शुक्रवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.

जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाहीत तर मंत्र्यांच्या गाड्यांना अडविण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी. शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे. शेतीमाल, भाजीपाला व फळांना हमीभाव कायदा करून भावांतर योजना लागू करावी. गाईच्या दुधाला ४० रुपये व म्हशीच्या दुधाला ७० रुपये हमीभाव द्यावा. प्रधानमंत्री पीकविमा




योजनेतील तरतुदी (पेरणी न होणे, प्रतिकूल हवामान, स्थानिक आपत्ती, कापणीनंतरची आपत्ती) पूर्ववत समाविष्ट कराव्यात. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या घरांना, जनावरांच्या गोठ्यांना व पशुधन वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत व भरपाई द्यावी. वाहून गेलेले तलाव, बंधारे, रस्ते व पूल यांची तातडीने दुरुस्ती करावी, आदी मागण्या करण्यात आल्या. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की १ जून ते २४ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात १००० ते ११०० मिमी इतका पाऊस झाला असून खरीप हंगामातील ५ लाख ७२ हजार हेक्टरवरील पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने सरसकट पंचनामे न करता तातडीने मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. सरकारने ३१ ऑगस्टपर्यंत जाहीर केलेली १७९ कोटी रुपयांची मदत अत्यंत अपुरी असून, ती शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी असल्याचे दुधगावकर यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात संजय पाटील दुधगावकर यांच्यासह भारत शिंदे, बालाजी डोंगे, नामदेव चव्हाण, इकबाल पटेल, किशोर आवाड, गौतम क्षीरसागर, बबन काळदाते, ॲड. प्रवीण शिंदे, ॲड. प्रमोद शिंदे, आप्पासाहेब आवाड, बाळासाहेब निगुट, गणपत भोसले, औदुंबर धोंगडे, शिवाजी ढोले, संभाजी गायकवाड, हनुमंत गरड, राजेंद्र शिंदे, अनिल जाधव, प्रशांत मेटे, गणेश धाबेकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

# जामखेड शहरात आदर्श फाऊंडेशनचे मोहटादेवी दर्शन

## आकाश बाफना यांचा उपक्रम : तब्बल २००० महिलांनी घेतला सहभाग

जामखेड । प्रतिनिधी

आदर्श फाऊंडेशनचे अध्यक्ष व युवा उद्योजक आकाश बाफना यांच्या वतीने मोहटादेवी दर्शनाचा शुभारंभ बुधवार, दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी व प्रभारी तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आदर्श फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाश बाफना, विनोद बेलेकर, नासिर सय्यद,अभयराजे राळेभात, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार डोंगरे,नय्युमभाई सुभेदार, ओंकार दळवी,पांडुरंग माने, तुषार बोथरा, निलेश पारख, तेजस बोरा, सुरेश भोसले, दत्तात्रय जगताप आदींसह माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आकाश बाफना यांनी सांगितले की, वडीलांचा लोकसेवेचा वारसा पांडुरंग भक्तीने पुढे नेण्याचा संकल्प मला रेणुकामातेने दिला,



नवरात्र उत्सव महिलांना सन्मान देण्याचा योग आहे. कुटुंबातील अडचणी असूनही मित्रपरिवार आणि हितचिंतकांच्या सहकार्याने मोहटादेवी दर्शन यात्रेचे उत्कृष्ट नियोजन झाले. जामखेड शहर तसेच नगर परिषद हद्दीतील सात गाव चुंबळी, लेहनेवाडी, बटेवाडी, जमादारवाडी, जांबवाडी, धोत्री, भुतवडा या भागातील महिलांनी उत्साहात सहभाग नोंदवला. शहरातील नवीन पोलीस स्टेशनसमोरून वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. तब्बल ६६ गाड्या मोहटादेवीच्या दर्शनासाठी रवाना झाल्या. दर्शनानंतर महिलांसाठी फराळाची विशेष व्यवस्था तारकेश्वर गड येथे करण्यात आली होती.यावेळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ (महाराज) शास्त्री यांची आकाश बाफना यांनी भेट घेऊन आशिर्वाद घेतला.या सामाजिक सेवेबद्दल बाफना यांचा शास्त्री महाराजांनी शाल,श्रीफळ देऊन सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभाशिर्वाद दिले.

# रस्ता मोकळा करून द्या नसता जिल्हाधिकारी कार्यासमोर उपोषण करणार

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वाघलखेडा ते शेवगा गावात ये जा करणारा रस्ता मोकळा करून देण्यासाठी अंबड तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. सर्व गावकरी व शेतकरी यांनी निवेदन दिले आहे. रस्ता मोकळा करून ना दिल्यास जिल्हाधिकारी कार्यासमोर उपोषण करण्यात येईल असा पण इशारा देण्यात आला. वाघलखेडा वाघलखेडा ते शेवगा हा रस्ता आम्हा गावकरी यांचा दळणवळनासाटी अत्यंत महत्वाचा रस्ता आहे . समस्त शेतकरी वर्ग यांना शेती करण्यासाठी व अंबड येथे ये जा करण्यासाठी हा अत्यंत महत्वाचा रस्ता आहे व त्या मुळे आपण स्वतः आमच्याकडे गावात येऊन हजर राहून आम्हाला रस्ता मोकळा करून द्यावा अशी आपणास आम्ही सर्व शेतकरी व गावकरी मंडळी आपणास विनंती करत आहोत .

सदरील रस्ता हा मेन हवे जालना ते अंबड हवे पासून फक्त ५ किलो मीटर अंतरावर आहे व त्याचं सोबत आमच्या सर्व सह्या करणाऱ्या शेतकरी आहे शेतीचा हा मेन रस्ता आहे आता सध्या आपण येऊन पाहिले तर सदरील रस्ता मध्ये पूर्ण पने पाणी साचलेले आहे व महिला मंडळी शेतकरी यांना शेतात ये जा करण्यासाठी व सोयाबीन काढणी करण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही .जर आपण याकडे लक्ष दिले नाही तर आम्ही सर्व शेतकरी जालना येथे जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे जाऊन उपोषण करणार आहे असा इशारा देण्यात आला. कारण आज आता कपाशी चे आधीच नुकसान झाले आहे , सोयाबीन पूर्ण पने खराब झालेली आहे जो वाचलेला शेतमाल शेतात आहे हा जर खराब झाला तर समस्त गावकरी यांना सामूहिकपणे आत्मदहन करण्याची आपल्या कडून परवानगी द्यावी अशी आपणास ह्या निवेदनाद्वारे आम्ही शेतकरी च्या वतीने देण्यात येत आहे.

# एक गोर सव्वा लाखेर जोर, चाकुरमध्ये बंजारा समाज आरक्षणासाठी रस्त्यावर



लातूर। प्रतिनिधी

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एस टी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी शुक्रवारी बंजारा समाज रस्त्यावर उतरून त्यांनी तहसील कार्यालयावर विराट मोर्चा काढला. याप्रसंगी बंजारा समाजाच्या वतीने विविध मागण्यांचे तहसीलदार यांना निवेदन दिले. दरम्यान तहसील कार्यालयासमोर लातूर-नांदेड महामार्गावर विराट सभा संपन्न झाली.हैदराबाद गॅझेटमध्ये गोर बंजारा समाजाची नोंद आहे. महाराष्ट्रातील तमाम बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून सरसकट एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन जातीचे प्रमाणपत्र द्यावे, या मागणीसाठी सकल बंजारा समाजाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मोर्चास सुरुवात झाली. वसंतराव नाईक चौक ते तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी पारंपरिक वेशात समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये महिलांची प्रामुख्याने गर्दी होती. तहसील कार्यालयासमोर लातूर-नांदेड महामार्गावर मोर्चाची सभा संपन्न झाली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार नरसिंग जाधव यांना देण्यात आले.

# परभणीत नेत्यांकडून शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न!

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यात अतिवृष्टी व जायकवाडी, माजलगाव धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याच्या बॅक वॉटरमुळे हाहाकार उडाला असून हजारो हेक्टर क्षेत्र बाधित झाल्यामुळे होत्याचे नव्हते झाले असून शेतकरी हतबल झाला आहे. अशा कठीण प्रसंगामध्ये शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी नेते मंडळी सरसावली असून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. काँग्रेसतर्फे नियुक्त करण्यात आलेली समितीही शनिवारी परभणी जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाचा दौरा करणार आहे.

मागील तीन महिन्यांपासून जिल्हाभरात अवकाळी पाऊस, ढगफुटी, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतशिवारात आज मरणासन्न अवस्था दिसून येत आहे. जून, जुलै, ऑगस्टमध्ये पावसाने हाहाकार माजवल्यानंतर सप्टेबरमध्ये तर अतिवृष्टी व धरणातून सोडलेल्या पाण्याने हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली जात शेतकऱ्यांच्या उरल्या सुरल्या स्वप्नांचीही राखरांगोळी झाल्याचे वास्तव आहे. जिल्ह्यात अतिवृष्टी व बॅक वॉटरच्या पाण्याने हाहाकार माजवल्यानंतर शेतकरीवर्गामध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्य दिसून येत आहे. गोदावरी व इतर नद्यांच्या काठावर असलेली गावे पूर्णपणे बाधित झाले आहेत. अनेक गावांमध्ये पाणी घुसल्याने राहत्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन नागरिकांना इतरत्र स्थलांतरित करण्याची वेळ आली आहे. पशुधना चेही वाहून जात व पुराच्या पाण्यामध्ये अडकून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी संकटात सापडला असताना जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोडर्डीकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

शासन तुमच्या पाठीशी आहे. प्रत्येकाला नुकसानीची मदत मिळणार आहे असा आश्वासक शब्दही दिला. काही दिवसांपासून खा. संजय जाधव, माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर, आ.डॉ. राहुल पाटील, आ. राजेश विटेकर, आ. रत्नाकर गुट्टे, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, माजी आ. विजय भांबळे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर देत शासन मदत मिळवून देण्याचा शब्द दिला. शेतकरी हतबल असताना लोकप्रतिनिधींनी तूर्तास किमान दिलासा देण्याचे काम तरी केले आहे.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५९१**

**दिनांक - / /२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राहुल बळीराम राठोड रा. रामनगर तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरवी राहुल राठोड | मुलगी | २२/०८/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५९२**

**दिनांक - / /२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राहुल बळीराम राठोड रा. रामनगर तांडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राजवीर राहुल राठोड | मुलगा | ०७/११/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# जामखेड मध्ये नवदुर्गांचा अनोखा सन्मान

## नगरसेवक अमित चिंतामणी यांच्यावतीने लाडक्या बहिणींना मोफत मोहटादेवी दर्शन



जामखेड । प्रतिनिधी

सभापती प्रा. राम शिंदे यांचे विश्वासू म्हणून ओळखले जाणारे जामखेड नगरपरिषदेचे नगरसेवक अमित चिंतामणी यांच्या वतीने सालाबादप्रमाणे शारदिय नवरात्र उत्सवाचे आयोजन केले आहे. त्यानुसार दि. २४ सप्टेंबर रोजी ६० गाड्यांमधुन महिलांनी मोहटादेवी दर्शनासाठी प्रस्थान केले असल्याचे नगरसेवक अमित चिंतामणी यांनी सांगितले. नगरसेवक चिंतामणी यांच्या वतीने होत असलेल्या शारदिय नवरात्र उत्सवाचे हे ११ वे वर्षे असून जामखेड शहरातीलमहिला भगिनींसाठी नेहमीच विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या कार्यक्रमाची धुरा अमित चिंतामणी यांच्या पत्नी प्रांजलताई अमित चिंतामणी यांनी घेतली आहे. त्याच अनुषंगाने त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मोहटादेवी दर्शनासाठी महिलांसोबत प्रस्थान केले. महिला भगिनींनी नवरात्रोत्सवा दरम्यान होणाऱ्या सर्वच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन प्रांजलताई अमित चिंतामणी यांनी केले आहे.

यावेळी बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले, पं.स. माजीसभापती डॉ. भगवान मुरूमकर,भाजपा तालुकाध्यक्ष बापुराव ढवळे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष बाजीराव गोपाळघरे, नगरसेवक अमित चिंतामणी, बाजार समिती उपसभापती नंदकुमार गोरे, जिल्हा उपाध्यक्ष अजय काशीद, माजी संचालक पोपट नाना राळेभात, संजय राऊत, प्रविण चोरडिया, संचालक विष्णू भोंडवे, डॉ. अल्ताफ शेख,ॲड. प्रवीण सानप, आनंद ढवळे, भाजपा युवा नेते तात्याराम पोकळे, गणेश काळे, नारायण जायभाय, उमेश देशमुख, आदी मान्यवरांसह भाविक भक्त व महिला उपस्थित होत्या.

# बीड जिल्ह्यामध्ये शुक्रवारी रात्रीपासून पावसाचा धुमाकूळ

## नदी-नाले ओसंडून वाहू लागले, धरणातून विसर्ग सुरु, धरणाखालील गावांना सतर्कतेचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**शुक्रवारी रात्री ११ वाजल्यापासून शनिवारी दुपारपर्यंत बीड जिल्ह्यामध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून या पावसामुळे सर्व शहरांमध्ये पाणी झाले आहे. रस्त्यावरून वाहने चालवणे कठीण झाले आहे. सर्वच रस्त्यावर पाणी असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. याशिवाय ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पिके अक्षरशः पाण्यात बुडाली आहेत.**







ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी घरे कोसळली असून पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यातील छोटी मोठी धरणे तुडंब भरल्याने यातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असून धरणाखालील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. येणाऱ्या आपत्तीस तोंड देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यासाठी नागरिकांना मदत व्हावी म्हणून टोल फ्री नंबर सुरू करण्यात आले आहेत.

बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, शिरूर, आष्टी, पाटोदा, माजलगाव, अंबाजोगाई, केज, धारूर, परळी अशा सर्व तालुक्यांमध्ये शुक्रवारी रात्रीपासून शनिवारी दुपारपर्यंत पावसाने धुमाकूळ घातला होता. या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके पाण्यात बुडाली. याशिवाय सर्व शहरे जलमय झाली. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. ग्रामीण भागामध्ये जुने चिरेबंदी वाडे आणि मातीची घरे ढासळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याशिवाय पशुधनाचेही मोठ्या नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची पिके पाण्यात बुडाल्याने त्यापासून पुढे काही उत्पन्न येईल अशी आशा दुरापास्त आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने करावी अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान बीड जिल्ह्यातील माजलगाव धरणातून ११ दारे उघडून एक लाख १३ हजार ९२४ क्युसेक्स पाणी नदीपात्रात सोडले जात आहे. याशिवाय ढालेगाव बॅरेज मधून एक लाख ६२,८९० क्यूसेक्स पाणी गोदावरी पात्रात सोडले आहे. कुंडलिका मध्यम प्रकल्पातून दहा हजार क्युसेक्स, ऊर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पातून दोन दारे खुली करून ४५४२ क्यूसेक्स, मांजरा धरणाचे ६दारे उघडून ४३ हजार ५१६ ,सिंदफणा धरणातून १५०० क्युसेक्स एवढा विसर्ग नदीपात्रात सोडल्याने धरणाखालील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान छत्रपती संभाजी नगरच्या पैठण तालुक्यात असलेल्या नाथसागरांची १८ दारे उघडल्याने ३७७२८ क्यूसेक्स पाणी गोदावरी पात्रात सोडले जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गोदावरी नदीमध्ये पाणी वाढले असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## तालुक्यात अतिवृष्टीचा जोर कायम अनेक गावांचा संपर्क तुटला, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात पुन्हा शुक्रवार दि २६ सप्टेंबर पासून अतिवृष्टीने घातलेल्या धुमाकूळा मुळे तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला असून नदी नाले ओसंडून वाहत असल्याने नागरिकांना ही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे व रविवारी दिवसभरही पाऊस सुरूच होता पावसामुळे शेतकऱ्याची पिके मात्र पूर्णपणे हातची गेली आहेत महसूल यंत्रणा रविवारी दिवसभर या परिस्थितीवर लक्ष ठेवून होतो होती व तालुक्यात अनेक गावचा पाहणी करून संपर्कही महसूल विभागाचे तहसीलदार श्रीकांत निळे व त्यांच्या विविध पथकांनी केला





धारूर तालुक्यात गेल्या पंधरा दिवसा पासून सततच्या अतिवृष्टीमुळे सर्वच पिके हाताची गेली आहेत शुक्रवारी रात्रीपासून विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजरी लावल्याने अनेक रस्त्यावरील वाहतूक बंद होती व विविध ठिकाणचे पूल वाहून जाणे रस्ते वाहून जाणे अशाही घटना घडल्या आहेत तहसीलदार श्रीकांत निळे यांनी नायब तहसीलदार ◀◀ पान २ वर

## माजलगाव धरणातून सिंधफना नदीपात्रात १ लाख १३ हजार ९२४.७४ क्युसेक्सने विसर्ग

माजलगाव । प्रतिनिधी

धरणाच्या पाणलोट क्षेत्रात धुवाधार पाऊस झाल्यामुळे माजलगाव तालुक्यात जिकडेतिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे माजलगावचे धरण भरल्यामुळे सिंदफना नदी पात्रात १ लाख १३ हाजार ९२४.७४ क्युसेस एवढा विसर्ग सिंधफना नदी पात्रात सोडला आहे त्यामुळे सांडस चिंचोली,मोगरा यासह अनेक गावाला पुराच्या पाण्याचा वेढा



पुर परिस्थिती बिकट! आनेक गावात पाणी शिरल्याने मंदिरे पाण्याखाली, अनेक गावांचा संपर्क तुटला

पडला अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये भरपूर पाऊस झाल्यामुळे माजलगाव धरण हे ऑगस्ट महिन्यातच भरले होते परंतु गेल्या ४८ तासापासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस जास्त झाल्यामुळे माजलगावच्या धरणातून सिंधफना नदीपात्रामध्ये सकाळपासून विसर्ग सोडण्यात आला असुन सायंकाळी ४:०० वाजल्यापासून धरणातून ◀◀ पान २ वर

## कारखेल खूर्द येथे ढगफुटीने हाहाकार

### चक्क गुडघाभर पाण्यातून घेउन जायची वेळ येत आहे प्रेतयात्रा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कारखेल खूर्द येथील स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पुल नाही ,शेकडो वर्षांपासून ग्रामस्थांना रात्री आपरात्री पुराच्या पाण्यातून वाट शोधीत जावे लागती प्रेतयात्रा... कारखेल खूर्द येथील भिमाबाई विठ्ठल घूले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले, शुक्रवारी रात्री १० वाजता पुराच्या



गुडघाभर पाण्यातून वाट शोधीत प्रेतयात्रा घेउन जायची आली आहे, कारखेल खूर्द येथे तात्काळ नदीवरील पूल बनवण्यात यावा आशी माघणी ग्रामस्थ सचिन घूले यांनी केली आहे.....

जयदत्त भैया यांनी कारखेल खुर्द ओल्या दुष्काळाचे पाणी केली, सोबत ग्रामपंचायत सदस्य अशोक वनवे .सरपंच रघुनाथ घुले .उपसरपंच ◀◀ पान २ वर

## ओला दुष्काळ : शेतात पाणी गौठयात पाणी घरा घरात पाणी!

चौसाळा । प्रतिनिधी

चौसळा परिसरात निसर्गाचा कहर उफाळून आला आहे. कालच्या मुसळधार पावसाने शेतं अक्षरशः पाण्याखाली गेली, गोठ्यात चिखलाचा साम्राज्य, तर घराघरांत पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

शेतकरी म्हणतोय, ''आता पिक काढू की घर वाचवू?''जनावरं गोठ्यात चिखलात उभी आहेत, चारा भिजून सडतोय. घरच्या चुली विझल्या, चपातीसाठी पीठसुद्धा ओली झाली. जिथे कोरड्या दुष्काळाची भीती होती तिथेह आता ओल्या दुष्काळाची टांगती तलवार. पिकं पाण्यात बुडाली, रस्ते वाहून गेले, शाळा बंद सगळं ठप्प!

गावकरी पावसाकडे पाहून फक्त एकच हाक देताहेत:

''देवा, पावसाचा कोप आवरा, आम्हाला जगू द्या!''निसर्गाच्या या खेळात शेतीच नाही तर संपूर्ण गावच हवालदिल झालं आहे. शासनाने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा, नुकसान भरपाई व मदत द्यावी आसे शेतकरी कैलाश केशव मुळे यांची व, हीच आज सर्वांची मागणी आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांचा माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्त गावांत दौरा

### देपेगाव व गंगामसला येथे टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आदेश

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दि २७ सप्टेंबर शनिवार रोजी तालुक्यातील पुरग्रस्त भागांचा दौरा केला. त्याच बरोबर देपेगाव व गंगामसला या ठिकाणी टँकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा करण्याचे आदेश दिले.

अतिवृष्टी व पुरामुळे माजलगाव तालुक्यातील नदीकाठच्या गावचे जनजीवन विस्कळित ◀◀ पान २ वर



## संत महंतांच्या मंगलमय उपस्थितीत 'बाजीराव पेट्रोलियमचे' आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन

परळी । प्रतिनिधी

परळी शहराच्या सेवा क्षेत्राचे वैभव वाढविणाऱ्या 'बाजीराव पेट्रोलियम' या नावाने परळी नंदागौळ-पुस- बर्दापूर या रस्त्यावर अत्याधुनिक पेट्रोल पंप उभारण्यात आला असुन या पेट्रोल पंपाचे आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व संत महंतांच्या मंगलमय उपस्थितीमध्ये उद्घाटन करण्यात आले. भर पावसातही झालेल्या या शानदार समारंभाला परळीतील मोठ्या संख्येने विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते.



ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर पासून काही अंतरावरच परळी ते नंदगौळपुस-बर्दापूर रोडवर, श्रद्धानंद गुरुकुल आश्रमासमोर उभारण्यात आलेल्या बाजीराव पेट्रोलियम या भारत पेट्रोलियमच्या अत्याधुनिक पंपावर २४ तास इंधन सेवा उपलब्ध राहणार असून ग्राहकांसाठी सर्व आधुनिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या पेट्रोल पंपाचा शुभारंभ आज माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.उद्घाटन प्रसंगी शांतिब्रह्म गुरुवर्य ह.भ.प.प. पू.महादेव महाराज चाकरवाडीकर, धर्मगुरू प.पू.अमृताश्रम स्वामी आणि १०८ नंदीकेश्वर ◀◀ पान २ वर

## उमरद (खा.) ते नागापूर रस्ता खुला करण्यासाठी चक्काजाम आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील उमरद खालसा येथून नागापूर बुद्रुक कडे जाणाऱ्या रहदारीच्या रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने या ठिकाणी व्यवस्थित रस्ता करता आला नाही. हा रस्ता शासनाने खुला करून द्यावा. या मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी सोमवारी चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा नागापूर येथील ग्रामस्थ राहुल टेकाळे यांनी दिला आहे.

राहुल टेकाळे यांनी जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता ,तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की राज्य रस्ता क्रमांक ५५ ला जोडणारा उमरद खालसा येथून नागापूर बुद्रुक या ठिकाणी डांबरी रस्ता आहे. या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले आहे. या ठिकाणी सिमेंट रस्ता होणे आवश्यक असतानाही ठराविक लोकांच्या विरोधामुळे हा रस्ता सिमेंटचा झाला नाही. यासंदर्भात अनेक वेळा प्रशासनाला ग्रामस्थांनी लेखी व तोंडी निवेदने दिली. मात्र हा रस्ता खुला झाला नाही. हा रस्ता नेहमीच गजबजलेला असल्याने आणि आज या ठिकाणी अतिक्रमणामुळे पाणी साचल्याने अपघात आणि आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावरून जाताना नागरिकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. हा रस्ता खुला करून द्यावा नसता २९ सप्टेंबर रोजी सोमवारी चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा राहुल टेकाळे यांच्या सह ग्रामस्थांनी दिला आहे.



## तलाठी रविंद्र गायकवाड यांच्या सतर्कते मुळे जोला गावावरील संकट टळले

केज । प्रतिनिधी

आज शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी केज तालुक्यातील मौजे जोला शिवारातील रक्ताळीचा माळ परिसरातील पाझर तलाव फुटणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती . शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी दुपारी सुरू झालेला जोरदार पाऊस आज शनिवार पर्यंत सुरूच होता यामुळे रक्ताळीचा माळ शेतातील पाझर तलाव तुडुंब भरून फुटण्याची मार्गावर आहे हि नागरिकांच्या लक्षात येताच सदरील माहिती गोविंद ढाकणे , भगवान करंजकर व आसाराम ढाकणे यांनी जोला तलाठी सजा चे तलाठी रविंद्र गायकवाड यांना दिली सदरची माहिती मिळताच गायकवाड यांनी जोला गावातील तलावाकडे धाऊ घेऊन तातडीने तलावाचा सांडवा फोडण्यासाठी स्वतः हातात टिकाऊ हातात घेऊन सुरवाती केली त्यांच्या बरोबर ◀◀ पान २ वर



## खोक्या भोसले जिल्ह्यातून हद्दपार

बीड । प्रतिनिधी

**शिरूर तालुक्यातील कुख्यात गुंड सतीश उर्फ खोक्या निराळ्या भोसले याच्यावर एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली असून त्याला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने हद्दपार करण्यात आले आहे.**

गेल्या अनेक दिवसापासून चर्चेत असलेला सतीश उर्फ खोक्या भोसले याच्यावर शिरूर, अमळनेर ,नेवासा, चकलांबा या पोलीस ठाण्यांतर्गत खुनाचा प्रयत्न करणे, कट रचने, मारहाण करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, दंगा करणे, अमली पदार्थ बाळगणे व त्याची विक्री करणे, अवैध शस्त्र बाळगणे ,वन्यजीव प्राण्याची शिकार करून त्याचा व्यापार करणे असे अनेक गंभीर गुन्हे त्याच्यावर असल्याने त्याला अनेक वेळा वर्तणूक सुधारण्यासाठी सूचना देऊनही त्यांचे पालन न केल्याने त्याच्यावर एमपीडीए कायद्याअंतर्गत हद्दपार करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त बी. फार्मसी महाविद्यालयात स्वच्छता अभियान यशस्वी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बी फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त स्वच्छता अभियान उत्साहपूर्ण आणि प्रभावी वातावरणात पार पडले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आयोजनात स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमात प्रा. मंदार चौधरी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करत सांगितले की स्वच्छता ही केवळ



जबाबदारी नसून ती आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग असावी असे सांगितले. तर प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी स्वच्छतेचा शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि सामाजिक शिस्तशी असलेला थेट संबंध स्पष्ट करून विद्यार्थ्यांना सतत स्वच्छतेसाठी तत्पर राहण्याचे ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रमात जमला पूरग्रस्तांसाठी सात लाखाचा निधी

**पिपरी चिंचवड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून मराठवाडा जनविकास संघाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण समारंभात धाराशिव जिल्ह्यातील पुरग्रस्तांसाठी सात लाख रुपयांचा निधी जमा झाला. मराठवाड्यातील आपल्या बांधवांचा संसार पुन्हा उभा राहावा, यासाठी देणगी देण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांनी केले होते. दरम्यान, विविध क्षेत्रातील व्यक्तींचा मराठवाडाभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

मराठवाडा जनविकास संघ आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम महोत्सव समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्तपणे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात मराठवाडा मुक्तीसंग्राम महोत्सव व पूरग्रस्त सद्भावना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भावनिक वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज काळेवाडी येथे ध्वजारोहणाने झाली. यानंतर कार्यक्रमापूर्वी मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील मरण पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. भाऊसाहेब जाधव, दिनेश वाघमारे, डॉ. एस. एन. पठाण, महावितरणचे कार्यकारी अभियंते सोमनाथ मुंडे, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विवेक मुगळीकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस होते. यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार, प्रकाश इंगोले, मनोज मोरे, दत्तात्रय धोंडगे, धनाजी येळकर, सतीश काळे, शंकर तांबे, बाळासाहेब साळुंके, विठ्ठल नवाने, युवराज माने, सुर्यकांत कुरुलकर, वामन भरगंडे, बाळासाहेब काकडे, श्रीमंत जगताप, राजेश घोडके, गणेश पाडुळे, जीवन बोराडे, केशव बोधले, गोरख पाटील, शिवाजी पाडुळे, नेताजी काशिद, सूर्यकांत चव्हाण, डी. एस. राठोड, प्रा. शाहूराज कदेरे, सचिन स्वामी, अनिताताई पांचाळ, कॅप्टन बालाजी पांचाळ, हरिभाऊ घायाळ, आण्णा जोगदंड, सुग्रिव पाटील, राजेंद्र मोरे, संजय जाधव, दिनेश पांढरे, अभिमन्यु गाडेकर, किशोर पाटील, सोमेश्वर झुमके, बळीराम कातंगळे, मुंजाजी भोजने, विजय वडमारे, शिवाजी घोडगे, बळीराम मळी, गोरख पाटील, दिनेश पवार, अतुल होळकर, जे.डी. माने, किशोर



आटरगेकर, राहुल शिंपले, अर्जुन खामकर, सुग्रीव पाटील, गोविंद तांबवडे, रंगनाथ आवारे, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, की मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. मुक्तीसंग्रामातून मिळालेली प्रेरणा केवळ इतिहासापुरती मर्यादित न ठेवता, ती सामाजिक आणि आर्थिक विषमतेतून मुक्ती मिळवण्यासाठी वापरावी.

डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, की मराठवाड्याच्या जनतेत प्रचंड क्षमता आहे. एकत्र येऊन काम केल्यास आपण प्रत्येक संकटावर मात करू शकतो. पूरग्रस्तांसाठी दाखवलेली ही सद्भावनाच आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहे.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. पुरुषोत्तम वायाळ म्हणाले, मराठवाड्याच्या शेतकर्यांनी पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड द्यावी. पाणी व्यवस्थापन आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून मराठवाड्याला पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम करण्याची गरज आहे. अनिल कुलकर्णी यांनी सामाजिक बांधिलकी व्यक्त करत पुरस्कार मिळाल्याचा आनंद आहे, पण समाजाप्रती आपली जबाबदारी वाढली आहे. पूरग्रस्तांसाठी उभा राहिलेला हा निधीच मराठवाड्याच्या एकजुटीचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले. अमर सूर्यवंशी म्हणाले, गावाचा विकास साधताना लोकसहभाग किती महत्त्वाचा असतो, हे मराठवाड्याने दाखवून दिले आहे. मुक्तीसंग्रामातून मिळालेल्या एकजुटीचा वापर आपण गावपातळीवरील समस्या सोडवण्यासाठी करावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रकाश इंगोले यांनी केले. आभार शाहूराज कदेरे यांनी मानले.

**पूरग्रस्तांना मदतीचा हात :**

मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी विशेष निधी संकलन करण्यात आला. या सद्भावना सोहळ्यात उपस्थित दानशूर व्यक्ती आणि संस्थांकडून सुमारे ७ लाख रुपयांचा निधी संकलित करण्यात आला, जो पूरग्रस्तांना तत्काळ वितरीत केला जाणार आहे.


**मराठवाडाभूषण पुरस्कारांनी मान्यवरांचा सन्मान :**

आळंदीचे ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांना सांप्रदायिक पुरस्कार, जलतज्ज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांना कृषि पुरस्कार, जकेकूरवाडी (ता. उमरगा) अमर सूर्यवंशी यांना आदर्श सरपंच पुरस्कार, पीएमआरडीएचे सहय्यक नगररचनाकार धैर्यशील बुवा यांना प्रशासकीय पुरस्कार, डॉ. अमोल विद्यासागर यांना साहित्य पुरस्कार, अनिल कुलकर्णी यांना उद्योगरत्न पुरस्कार, सुवर्णपदक विजेते कुस्तीपट्टू सुमीत भोसले यांना मल्लरत्न पुरस्कार, क्रीडा अधिकारी प्रियांका इंगळे यांना क्रीडा पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या प्रिया कदम-भगत यांना महिला सक्षमीकरण पुरस्कार, वायसीएम'चे डॉ. दिनेश गाडेकर यांना वैद्यकीय पुरस्कार, नागन्नाथ मानूरचे सरपंच अशोक पाखरे यांना सामाजिक पुरस्कार, गायक सुरेश कदम यांना संगीतरत्न पुरस्कार, मोहन जाधव यांना पत्रकारिता पुरस्कार, सूरज मांजरे यांना विशेष पुरस्कार आदी पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## खडकवासला धरणातील विसर्ग ६८६४ क्युसेक; तीन धरणात १०० टक्के पाणीसाठा

खडकवासला । प्रतिनिधी

धरण साखळीतील पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांचा पाणीसाठा पूर्ण क्षमतेने म्हणजे १०० टक्के झाला आहे. खडकवासला धरण ९४.७९ टक्के भरले असून, या धरणातून शनिवारी रात्री नऊ वाजता मुठा नदीत ६८६४ क्युसेक विसर्ग सुरू होता.



खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीत पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढला. गुरुवार, ता. २५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता सुरू असलेला ४२१ क्युसेक विसर्ग बंद केला गेला. त्यानंतर २७ तासांनी, म्हणजे शक्रवारी, ता. २६ सप्टेंबर संध्याकाळी ५ वाजता, ८४८ क्युसेकने विसर्ग पुन्हा सुरू झाला.

शनिवारी, ता. २७ सप्टेंबर सकाळी ८ वाजता हा विसर्ग २१०५ क्युसेकवर वाढवला गेला पूर्वीच्या विसर्गापासून १५ तासांनी. नंतर सकाळी १० वाजता विसर्ग ३७८९ क्युसेक झाला २ तासांनी वाढ. सायंकाळी ७ वाजता विसर्ग ५०२७ क्युसेक झाला ९ तासांनी वाढ, तर रात्री ९ वाजता विसर्ग ६८६४ क्युसेक करण्यात आला २ तासांनी वाढ.

### विसर्ग वाढण्याची शक्यता

खडकवासला धरणातील पाण्याची आवक वाढत असल्याने शनिवारी सकाळ पासून हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढविला आहे. या धरणातील विसर्ग १० हजार क्युसेकपर्यंत पोहोचण्याची शक्यता मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्षाने वर्तवली आहे.

## दूध उत्पादकांच्या समस्यांकडे लक्ष द्या: प्रभाकर बांगर

मंचर । प्रतिनिधी

दुधामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असून, त्यासाठी शेतकरी दोषी नसून, डेअरीमालक आणि दुधाचे प्लांटधारक जबाबदार आहेत. तसेच, गोवंश हत्याबंदी कायद्याचा आधार घेत हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते जनावरांच्या खरेदी-विक्रीमध्ये हस्तक्षेप करत असल्याने शेतकरी वर्ग वैतागला आहे.

या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी निवेदनाद्वारे केली.पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाची वार्षिक सभा पुणे येथे शुक्रवारी (दि. २६) झाली. या वेळी उपमुख्यमंत्री पवार, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष ड. स्वप्निल ढमढेरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. बैठकीत बांगर यांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या.निवेदनात म्हटले आहे की, संकरित जर्शी गायींच्या गोऱ्ह्यांचा शेती वा बैलगाडी कामासाठी उपयोग होत नसल्याने शेतकरी ती सोडत आहेत. पशुसंवर्धन विभागाने या गायी उपलब्ध करून दिल्या असल्यामुळे शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे. शेतकऱ्यांनी देशी गोवंशावर भर देण्याची आणि संकरित गायींच्या मर्यादेत बदल करण्याची मागणी केली. दुसरीकडे, दुधामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असून, त्यासाठी शेतकरी जबाबदार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या भेसळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, कॅन्सरसारखे आजार वाढत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी भेसळ रोखण्यासाठी कठोर कायदा, दोषींना जामिन नाकारणे आणि अन्न व औषध प्रशासनाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी याबाबत लवकरच मुंबई येथे बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याचे बांगर यांनी सांगितले.

## माळेगाव कारखान्याची ७० वी वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

पुणे : माळेगाव सहकारी साखर कारखान्याची ७० वी वार्षिक सर्वसाधारण सभा उपमुख्यमंत्री तथा कारखान्याचे चेअरमन अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली शिवतीर्थ मंगल कार्यालयात पार पडली. यावेळी व्हाईस चेअरमन संगिता कोकरे, कार्यकारी संचालक अशोक पाटील, जेष्ठ संचालक बाळासाहेब तावरे योगेश जगताप, स्वप्नील जगताप,विरोधी संचालक चंद्रराव तावरे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला मृत्यू पावलेले कारखान्याचे सभासद,कामगार, शास्त्रज्ञ व देशासाठी शहीद झालेले जवान यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच एकरी १०० टन ऊस उत्पादन केलेल्या सभासदांचा सत्कार करण्यात आला. सभेच्या प्रारंभी कार्यकारी संचालक अशोक पाटील यांनी प्रास्ताविक केले.अहवाल



वाचन जवाहर सस्ते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिल धुमाळ यांनी तर आभार संचालक नितीन शेंडे यांनी मानले. सभेत बोलताना चेअरमन अजित पवार म्हणाले की, कॉम्प्रेस्ड बायोगॅस (उइऋ) प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीचा मार्ग मिळेल. या प्रकल्पासाठी ७१ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, त्यातील १८ कोटी स्वनिधीतून तर उर्वरित ५४ कोटी कर्जाद्वारे उभारले जाणार आहेत. हा प्रकल्प एका वर्षात पूर्ण होऊन दोन वर्षांत कर्जमुक्त होईल. दररोज १५ टन बायोगॅस निर्मिती होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी अजित पवार यांनी शिवनगर विद्या प्रसारक मंडळातील भ्रष्टाचारावर अप्रत्यक्षपणे टीका करत, मागील काही चेअरमनच्या कारभारावर बोट ठेवले. संस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच जिथे वळण आहे किंवा डावा कालवा फुटण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणी अस्तरीकरण करण्यात येईल, अशी माहिती दिली.सभेच्या दरम्यान जेष्ठ विरोधी संचालक चंद्रराव तावरे, दशरथ राऊत, युवराज तावरे, प्रा. ज्ञानदेव बुरुंगले, अरविंद बनसोडे, विक्रम कोकरे, राजेश देवकाते, अशोक तावरे, प्रकाश सोरटे आदी सभासदांनी विविध प्रश्न उपस्थित केले.

## सराईत आरोपीच्या ताब्यातून देशी पिस्टल हस्तगत; बंडगार्डन पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन तपास पथकाने एका सराईत आरोपीला देशी बनावटीच्या पिस्तूलसह जेरबंद करत मोठी कामगिरी केली आहे. पुणे शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांनी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्तीसाठी आदेश दिले होते. त्यानुसार मालधक्का रोड, रेल्वे कोर्टाजवळ संशयित इसम थांबलेला असल्याची खात्रीशीर माहिती अंमलदार ज्ञानेश्वर बडे, मनोज भोकरे व मनिष संकपाळ यांना मिळाली.**

माहिती मिळताच पोलीस उप-निरीक्षक धिरज गुप्ता यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.



अंगझडतीत त्याच्या कमरेला मॅगझीनसह देशी बनावटीचे पिस्तूल आढळले. चौकशीत त्याचे नाव देव दिनेश परमार (२३, रा. स्विपर चाळ, वीर भारत तरुण मंडळाजवळ, माजी मार्केट, ताडीवाला रोड, पुणे) असे निष्पन्न झाले.

या प्रकरणी भारतीय हत्यार कायदा कलम ३(५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला २६ ते २८ सप्टेंबर पर्यंत पोलीस कस्टडी सुनावली आहे. आरोपीवर यापूर्वीही एकूण ५ गुन्हे नोंद असून, त्याच्यावर एमपीडीएअंतर्गत स्थानबंदीची कारवाई करण्यात आलेली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) राजेंद्र बनसोडे, उप पोलीस आयुक्त (परिमंडळ २) मिलिंद मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त (लष्कर विभाग) संगिता आल्फान्सो शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संपतराव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या मोहिमेत पोलीस उप-निरीक्षक धिरज गुप्ता, उप-निरीक्षक मोहन काळे, सहाय्यक .उप-निरीक्षक प्रदीप शितोळे, पोलीस हवालदार सारस साळवी, प्रकाश आव्हाड, अंमलदार ज्ञानेश्वर गायकवाड, ज्ञानेश्वर बडे, मनिष संकपाळ, मनोज भोकरे, शिवाजी सरक, राजू घुलगुडे यांनी सहभाग घेतला.

## फीस थकली म्हणून शिक्षणापासून विद्यार्थ्यांना ठेवले वंचित

### किडजी स्कुलचा प्रताप ; पालकांमध्ये संतापाची लाट

**सांगावी । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक शाळेमध्ये मराठी असो की इंग्रजी या खाजगी संस्थांमध्ये पाल्यांसाठी काही कोठा निश्चित केला आहे असे असताना शासनाचे नियम पायदळी तुडवत अनधिकृत फी वसुली करून किडझी पिंपळे गुरव प्री स्कूल ने पालकांची केली फसवणूक करत असल्याने पालकात संताप निर्माण झाला आहे अशा संस्थांना अधिकारी पाठीशी घालत असल्याचेही दिसत आहे त्यामुळे सक्तीची वसुली केली जात असून अशा शाळा वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पालक वर्गांमधून होत आहे.



पिंपरी चिंचवड शहरातील पिंपळे गुरव येथील किडझी प्री स्कूलने पालकांची फसवणूक केली असल्याचे स्वतः पालकांनी पुढे येऊन पत्रकारांना माहिती दिली. पालकांकडून भरमसाट फी वसूल केली जाते परंतु त्याच्या पावत्या दिल्या जात नाहीत. बहुसंख्य पालकांना पावत्या न देता फी रोख रक्कम स्वरुपात स्वीकारली जाते तर काही प्रमाणात ऑनलाईन फी ही शाळा संचालक स्वतः च्या वैयक्तिक अकाऊंट ला घेतात तर काही काही प्रक्रमाणात शाळेच्या अकाउंटला घेतात. त्यामुळे शाळा प्रशासन प्रचंड प्रमाणात सरकारचा कर बुडवण्यासाठी वेगवगेळ्या अनधिकृत कल्पना राबवत असल्याचे पालकांनी सांगितले. तसेच एखाद्या विद्यार्थ्यांची फी थकली किंवा एक जरी फी चा हप्ता थकला तर थेट विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यापासून मज्जाव केला जातो. विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित केले जाते. पालकांनी फी ची भरण्याची वेळ मागितली तरी तशी मुभा न देता शाळा प्रशासन पालकांशी उद्धट आणि उर्मट भाषेत बोलून उलट पालकांनाच धमकावल्याचा प्रकार स्वतः पालकांनी सांगावी पोलिस स्टेशन मध्ये येऊन सांगितला. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या नावाखाली देखील भरमसाठ पैसे पालकांकडून घेतले जातात परंतु कार्यक्रमाच्या वेळी मुलांची आणि पालकांची योग्य ती सोय होत नाही. पालकांकडून शाळेने घेतलेले पैसे कोणत्या कोणत्या कार्यासाठी घेतले अशी पालकांनी विचारणा केली असता पालकांना आणि मुलांना धारेवर धरले जाते. शाळेचे संचालक प्रभाकर साळुंखे आणि संबंधित शाळा प्रशासनाच्या विरोधात लेखी तक्रार गुरवार दिनांक २५ रोजी सांगावी पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे

## नरभक्ष बिबट्यासाठी १० पिंजरे

नारायणगाव: कुमशेत (ता. जुन्नर) येथे दोन दिवसांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात सिद्धार्थ केदारी हा सहा वर्षाचा बालक ठार झाला आहे. या हल्ल्याने वन खाते खडबडून जागे झाले आहे.

या नरभक्षक बिबट्याला पकडण्यासाठी १० पिंजरे, सहा ड्रोन कॅमेरे, पाच कॅमेरे व २५ कर्मचाऱ्यांची फौज तैनात करण्यात आली आहे. बिबट्या पिंजऱ्याच्या परिसरात फिरून जातो. परंतु, तो जेरबंद होत नाही, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

जुन्नर तालुक्यामध्ये बिबट्या व मानव संघर्ष पुन्हा सुरू झाला आहे. बिबट्याचे हल्ले पुन्हा वाढू लागले आहेत. त्यामुळे जुन्नर तालुक्यात गावोगावी दहशतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या दर्शनामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये काम करणे अवघड होऊन बसले आहे. दरम्यान, तीन दिवसांपूर्वी कुमशेत या ठिकाणी दोन दिवसांपूर्वी सिद्धार्थ केदारी या मुलाला बिबट्याने राहत्या घरातून उचलून नेले.

त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या परिसरात या नरभक्षक बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने संपूर्ण यंत्रणा कामाला लावली आहे. परंतु, बिबट्या काही पिंजऱ्यात जेरबंद होत नाही. बिबट्याचा उपद्रव वाढल्याने व पाळीव प्राणी व मानवावर हल्ला वाढला आहे. त्यामुळे जनतेचा आक्रोश वाढू लागला आहे. मोठ्या संख्येने वाढलेल्या बिबट्याचा बंदोबस्त कसा करायचा? याबाबत वन खातेदेखील हतबल झाले आहे.दरम्यान, जुन्नर तालुक्यात बिबट्याचे हल्ले मानवावर होऊ लागल्याने तालुक्यातील जनतेचा उद्रेक वाढला आहे. कायमस्वरूपी बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी व शासनाचे याकडे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबरला जुन्नर या ठिकाणी या



विषयावर सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केल्याची माहिती आमदार शरद सोनवणे यांनी दिले. ते म्हणाले, घटना घडल्यावर दुसऱ्या दिवशी मी घटनास्थळी भेट देऊन सिद्धार्थ केदारी यांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले आहे. माजी आमदार अतुल बेनके, भाजप नेते आशाताई बुचके, वन विभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, सहाय्यक उपवनसंरक्षक स्मिता राजहंस, वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांची एकत्रित बैठक झाली. त्यात ३० सप्टेंबर रोजी सर्वपक्षीय बैठक घेऊन बिबट्यासंदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

## अष्टविनायक रस्त्यावर भीषण अपघात! ३२ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

मंचर - अष्टविनायक रस्त्यावर पोंदेवाडी फाटा (ता.आंबेगाव) येथे अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत सविंदणे (ता.आंबेगाव) येथील दत्तात्रय ज्ञानेश्वर गावडे (वय ३२) या युवकाचा मृत्यू झाला.हा अपघात शुक्रवार, दि.२६ रोजी सकाळी आठ वाजता घडला. अपघात झाल्यावर अज्ञात वाहन पसार झाले. पारगाव पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे.याबाबत समजलेली माहिती अशी की, सविंदणे येथून मोटरसायकल क्रमांक एम एच १४ सी एन ९८३० याद्वारे पारगावकडे दत्तात्रय ज्ञानेश्वर गावडे हे

आपली दुचाकी घेऊन जात असताना पोंदेवाडी फाटा येथे समोरून चुकीच्या दिशेने आलेल्या अज्ञात वाहनाने मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी दुचाकीस्वार दत्तात्रय गावडे यांना पारगाव येथील रुग्णवाहिका चालक संदीप घुले यांनी खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. परंतु पुढील उपचारासाठी मंचर येथे आणत असताना पिंपळगाव येथे वाटेतच त्यांचे निधन झाले. अपघात करून अज्ञात वाहन चालक पळून गेला आहे. अपघाताची माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे स्वीय सहाय्यक रामदास वळसे पाटील यांना मिळताच त्यांनी पारगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधून तातडीने पंचनामा करण्याची सूचना केली. तसेच मंचर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी तातडीने शवविछेदन करण्यासाठी समक्ष भेट देवून सूचना केली. मंचर उपजिल्हा रुग्णालयात पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांनी भेट देऊन अपघाताची माहिती घेतली.अपघाताची फिर्याद रतन दत्तात्रय पडवळ रा. सविंदणे यांनी पारगाव पोलीस ठाण्यात दिली.मयत दत्तात्रय गावडे यांच्यामागे आई-वडील भाऊ असा परिवार आहे.

## ऑन ड्यूटी डॉक्टर झाला 'तर्राट'

### नागरिकांच्या तक्रारीनंतर सेवा समाप्तीची कारवाई

पुणे । प्रतिनिधी

कर्तव्यात असताना दारू पिऊन 'तर्राट' झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याने नशेतच बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या बालकाच्या मृतदेहाच्या शवविच्छेदनाचा प्रयत्न केला. संबंधित डॉक्टर हा नशेत असल्याचे लक्षात येताच नातेवाईक व सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित डॉक्टरला घेराव घालत त्याला जाब विचारत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर हा प्रकार घातला.

हा प्रकार बुधवारी (ता. २४) रोजी जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात घडला असून आरोग्य विभागाने संबंधित डॉक्टरची सेवा समाप्त केली आहे. या घटनेवरून पुण्यातील सरकारी रुग्णालयांमधील आरोग्यसेवेची दयनीय अवस्था समोर आली आहे. जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथे बिबट्याच्या हल्ल्यात केदार या सात वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. त्याच दिवशी त्याचा मृतदेह घेउन नातेवाईक जुन्नर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे डॉ. आर. आर. हांगे हे कर्तव्यावर असल्याची त्यांनी ओळख करून दिली.डॉ. हांगे हे बालकाचे शवविच्छेदन करत असताना नातेवाईवाईकांना ते दारूच्या नशेत असल्याचा संशय आला. त्यांनी डॉ. हांगे यांना बाहेर बोलावले व त्यांची चित्रफीत काढत त्यांची चांगलीच खरडपट्टी काढली.त्यावेळी डॉ. हांगे यांनी नातेवाइकांना त्यांची तब्येत बरी नसल्याचे व खोकला येत असल्याने खोकल्याचे औषध घेतल्यामुळे गुंगी येत असल्याचे सांगितले. मात्र नातेवाइकांनी त्यांच्या तोंडाचा दारू पिलेला असल्याचा वास येत असल्याचा आरोप करत वरिष्ठ डॉक्टरांना फोन करून या घटनेची माहिती दिली.याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांना विचारले असता ते म्हणाले की संबंधित डॉ. हांगे हे शल्यविशारद (सर्जन) असून त्यांना दीड महिन्यापूर्वीच जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात कंत्राटी तत्त्वावर वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त केले होते.तेथे त्यांच्यावर रुग्णांवर उपचार करण्याची तसेच शवविच्छेदन करण्याचीही जबाबदारी होती. मात्र, संबंधित घटनेबाबतचा व्हिडिओ पाहून डॉ. हांगे यांनी गैरवर्तन केल्याचे दिसून येत आहे. त्यावरून त्यांची सेवा समाप्त केली आहे.